रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक २५५
www.ramprahar.com
# राम प्रहर
बुधवार, २ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## वक्फ दुरूस्ती विधेयक आज लोकसभेत होणार सादर



**नवी दिल्ली :** वक्फ दुरूस्ती विधेयक बुधवारी (दि. २) लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासानंतर दुपारी १२ वाजता सादर केले जाणार आहे. विशेष म्हणजे यावर चर्चेसाठी सभापती ओम बिर्ला यांनी आठ तासांचा वेळही राखून ठेवला आहे. संसदेच्या संयुक्त समितीच्या अहवालानंतर सुधारणा करण्यात आलेल्या विधेयकावर लोकसभेत चर्चा होईल. त्यानंतर त्या विधेयकाच्या मंजुरी प्रक्रियेला सुरुवात करण्यात येईल. ऑगस्ट २०२४मध्ये अल्पसंख्याक व्यवहारमंत्री किरेन रिजिजू यांनी लोकसभेत हे विधेयक सादर केल्यानंतर ते जेपीसीकडे पाठवण्यात आले. संसदीय समितीने बहुमताने अहवाल स्वीकारला. गदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखालील जेपीसीच्या अहवालानंतर सुधारित विधेयकाला मंत्रिमंडळाने आधीच मंजुरी दिली आहे. आता ते लोकसभेत सादर होईल.

### अंतरंग
मुख्यमंत्री रोजगार निर्मितीमध्ये कोकणाची उत्तुंग भरारी/२
माथेरानमध्ये व्यावसायिकांसाठी आता ड्रेसकोड, ओळखपत्र/५
विंडसर्फिंग व काइटबोर्डिंगमध्ये राज पाटीलला सुवर्णपदक/८

# रायगडात अवकाळी पावसाची हजेरी

**अलिबाग, श्रीवर्धन, माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्याच्या काही भागात सोमवारी रात्री तसेच मंगळवारी सकाळी अवकाळी पावसाने हजेरी लावली तसेच दिवसभर वातावरण ढगाळ होते. बदलत्या वातावरणाचा विपरित परिणाम रब्बी हंगामातील पिकांवर होण्याची शक्यता आहे.

हवामान खात्याने अवकाळी पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवला होता. सोमवारी दिवसभर ढगाळ वातावरण होते. मंगळवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास अलिबाग शहर व आसपासच्या परिसरात अवकाळी पाऊस पडला. त्यामुळे काहीसा गारवा निर्माण झाला, पण वातावरण दमट होते.

मागील काही दिवसांपासून श्रीवर्धन तालुक्यातील हवामानातही प्रचंड प्रमाणात बदल झालेला आहे. दुपारच्या वेळेला प्रचंड सोसाट्याचा वारा सुटत होता, मात्र गेल्या चार दिवसांपासून वाऱ्याचे प्रमाण कमी झाले असून वातावरण ढगाळ झाल्याचे दिसून येते. अशातच सोमवारी रात्री श्रीवर्धन तालुक्यात रिमझिम पावसाने हजेरी लावली.

ढगाळ वातावरणामुळे हवेतील सापेक्ष आर्द्रता वाढल्याने घाम येण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणावर घडत आहे. अनेकांना सर्दी, पडसेसारखे आजार जडलेले पहायला मिळत आहेत. पाऊस मोठ्या प्रमाणावर पडल्यास यात वाढ होऊ शकते.



### पांढरा कांदा उत्पादक अडचणीत

अवकाळी पावसाचा फटका अलिबाग तालुक्यातील पांढरा कांदा उत्पादकांना बसला आहे. अलिबाग तालुक्याच्या खंडाळे, नेहुली परिसरात सध्या पांढऱ्या कांद्याची काढणी अंतिम टप्प्यात आहे. शेवटच्या काढणीचा कांदा शेतकऱ्यांनी शेतातच वाळत ठेवला होता, मात्र हा कांदा पावसाने भिजला आहे. यामुळे कांद्याची पात कुजल्याने ती विणीला येणार नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. दरम्यान, कांदा उलथवणीचे काम शेतकऱ्यांनी हाती घेतले होते, मात्र दिवसभर मळभ असल्याने कांदा अपेक्षित वाळला नाही.

### आंबा बागायतदार धास्तावले

खराब हवामानाचा फटका आंबा बागायतदारांना बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही बागायतदारांच्या बागांमध्ये आंब्याचे फळ बऱ्यापैकी मोठे झाले आहे. काही ठिकाणी फळ अद्यापही छोटे आहे, तर काही बागांमध्ये झाडे मोहोर लागलेल्या अवस्थेत आहेत. ढगाळ वातावरणामुळे मोहोर करपण्याची व छोटी असलेली कैरी गळून पडण्याची भीती असते. बदलल्या वातावरणामुळे आंबा पिकाचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बागायतदार चिंतातुर झाले आहेत.

**सध्या पडणारा पाऊस पूर्वमोसमी आहे. आज सकाळी अलिबाग तालुक्याच्या काही भागात पावसाच्या तुरळक सरी बरसल्या. जिल्ह्यात सर्वत्र अजूनही ढगाळ वातावरण आहे. काही भागात तुरळक ठिकाणी ढगांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता आहे.**

**-सागर पाठक, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी**

**अवकाळी पावसामुळे आंब्याची देठं कुजणे, फळ गळती होणे आणि आंबा साकवणे असे दुष्परिणाम होऊ शकतात. आधीच या वर्षी आंबा कमी आहे. अशात अवकाळी पाऊस झाला तर दुहेरी फटका बागायतदारांना बसू शकतो.**

**-डॉ. संदेश पाटील, आंबा बागायतदार**

### बदलत्या हवामानामुळे नागरिक त्रस्त

गेल्या काही दिवसांपासून रायगड जिल्ह्यात सातत्याने बदलणाऱ्या हवामानामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. मागील काही दिवसांपासून तापमान वाढले होते. त्यानंतर वातावरण ढगाळ राहिले. आता अचानक अवकाळी पाऊस पडला. पहाटे गारवा आणि दिवसभर असह्य उकाडा यामुळे लोक कमालीचे हैराण झाले आहेत.





**मुंबई : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ९०व्या वर्धापन दिनानिमित्त एनसीपीए नरिमन पॉईंट येथे आयोजित कार्यक्रमास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची प्रमुख उपस्थिती लाभली. व्यासपीठावर राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, रिझर्व्ह बँकेचे गर्व्हनर संजय मल्होत्रा आदी उपस्थित होते. या वेळी मान्यवरांच्या हस्ते विशेष स्टॅम्पचे अनावरण करण्यात आले.**

## माझ्या खुनाचा कट रचण्यात आला होता -आमदार धस

**बीड : प्रतिनिधी**

सतीश भोसले उर्फ खोक्या प्रकरणात मला व्हिलन ठरवून माझ्या खुनाचा कट रचण्यात आला होता, असा खळबळजनक दावा भाजप आमदार सुरेश धस यांनी केला आहे.

सतीश भोसले हरणांना मारून त्याचे मांस हे सुरेश धस यांना पुरवतो, असे सांगून बिश्नोई गँगच्या काही लोकांना विमानाने मुंबईत आणण्यात आले होते. या लोकांना माझी हत्या करण्यासाठी आणले होते, असे आमदार सुरेश धस यांनी एका मराठी वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे. आमदार धस यांच्या या दाव्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

## गुजरातच्या फटाका कारखान्यात स्फोट; १७ जणांचा मृत्यू

**गांधीनगर : वृत्तसंस्था**

गुजरातच्या बनासकांठामध्ये एका फटाक्याच्या कारखान्यात मंगळवारी (दि. १) सकाळी भीषण स्फोट होऊन आग लागली. या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला असून काही जण जखमी झाले आहेत.



दीपक ट्रेडर्स नावाच्या कारखान्यात हा बॉयलरचा स्फोट झाला. या वेळी ३० कामगार कारखान्यात काम करीत होते. स्फोटाचा आवाज ऐकताच आसपासचे लोक कारखान्याजवळ पोहचले तेव्हा कारखान्यातून आगीच्या ज्वाळा बाहेर पडत होत्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोहचून शर्थीचे प्रयत्न करीत आग विझवली. त्याचप्रमाणे मदत आणि बचावकार्य सुरू करण्यात आले.

जखमींना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे, तर स्फोटाच्या तपासाचे आदेश देण्यात आले आहेत.

## निवडक

### प्रशांत कोरटकरचा जामीन अर्ज फेटाळला

**कोल्हापूर :** छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य करून इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना धमकावणारा प्रशांत मुरलीधर कोरटकर (रा. नागपूर) याचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे. कोरटकरच्या वकिलाने जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. यावर मंगळवारी (दि. १) सुनावणी झाली. सरकारी वकिलाच्या जोरदार युक्तीवादानंतर न्यायालयाने कोरटकरचा जामीन अर्ज फेटाळून लावला. त्यामुळे कोरटकरच्या कळंबा जेलमधील मुक्कामात वाढ झाली आहे.

### रणवीर अलाहाबादियाच्या परदेश प्रवासावरील बंदी कायम

**नवी दिल्ली :** इंडियाज गॉट लेटेंट या पॉडकास्टमध्ये आक्षेपार्ह टिपण्णी करणारा यूट्यूबर रणवीर अलाहाबादियाने पासपोर्टची मागणी केली होती, मात्र सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि. १) ही मागणी फेटाळून लावली. त्यामुळे सध्या तरी रणवीर अलाहाबादियाला पासपोर्ट मिळणार नाही तसेच या प्रकरणाची पुढील सुनावणी दोन आठवड्यांनी होणार आहे.

## वार्षिक आराखड्यातील विकास निधीचा विनियोग करण्यात रायगड राज्यात तिसरा

### ■ सलग चौथ्या वर्षी शंभर टक्के निधी केला खर्च

**अलिबाग : प्रतिनिधी**

सन २०२४-२५च्या जिल्हा वार्षिक आराखड्यातील १०० टक्के निधीचा विनियोग करण्यात रायगड प्रशासनाला यश आले आहे. दिलेल्या मुदतीत जिल्हा वार्षिक आराखड्यातील विकास निधीचा विनियोग करण्यात रायगड कोकणात दुसऱ्या, तर राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. सलग चौथ्या वर्षी रायगडने जिल्हा विकास निधी शंभर टक्के खर्च केला आहे.

सन २०२४-२५च्या ४३२ कोटी रुपयांच्या रायगड जिल्हा वार्षिक आराखड्याला मंजुरी देण्यात आली होती. यापैकी ३१ मार्चअखेर हा सर्व निधी खर्च झाला आहे. अनुसूचित जमाती उपयोजनेंतर्गत जिल्ह्यासाठी २८ कोटींचा निधी प्राप्त झाला होता. हा निधीदेखील शंभर टक्के खर्च झाला आहे, तर आदिवासी उपयोजनेंतर्गत ४१ कोटी ६० लाखांचा निधी जिल्ह्यासाठी प्राप्त झाला होता. यापैकी ४१ लाख ४८ लाख रुपये खर्च झाला आहे. आमदार निधी योजनेंतर्गत जिल्ह्यासाठी ३९ कोटी ९४ लाखांचा निधी प्राप्त झाला होता, ज्यापैकी ३९ कोटी ६२ लाख रुपयांचा निधी खर्च झाला आहे.

जिल्हा विकास निधी अंतर्गत सर्व विभागांना दिलेला निधी मार्चअखेरपर्यंत खर्च झालाच पाहिजे अशा सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सर्व विभागांना दिल्या होत्या. या निर्देशांचे बहुतांश विभागांनी पालन केले. त्यामुळे ३१ मार्चला दुपारी १ वाजताच शंभर टक्के निधी खर्ची झाला.

सन २०२४-२५ हे निवडणुकांचे वर्ष होते. आधी लोकसभा आणि नंतर विधानसभा निवडणुकीचा काळ होता. त्यामुळे जिल्हा विकास निधी आचारसंहितेच्या कात्रीत सापडू नये यासाठी खबरदारी घेणे आवश्यक होते. अन्यथा विकास निधी समर्पित होण्याची धास्ती होती, परंतु प्रशासनाने नेटाने प्रयत्न करून सर्व कामे मार्गी लावली. जिल्हाधिकारी जावळे यांनी कोषागार कार्यालयात जाऊन निधी विनियोगाच्या कामकाजाचा आढावा घेतला. योग्य नियोजन आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा यामुळे जिल्हा विकास आराखड्यातील शंभर टक्के निधी खर्च करण्यात यश आले. या निधीतून ३८० कामे करण्यात आली, अशी माहिती रायगड जिल्हा नियोजन अधिकारी जे.एम. मेहेत्रे यांनी दिली.

## ग्रामपंचायतींमध्ये उत्तम संपर्क यंत्रणा निर्माण करा -केंद्रीय मंत्री सिंधिया



**मुंबई : प्रतिनिधी**

देशात प्रत्येक ग्रामपंचायतीला वेगवान संपर्क यंत्रणा निर्माण करण्यासाठी भारत नेट प्रकल्प राबविण्यात येत आहे. भारत नेट टप्पा-१ मध्ये महाराष्ट्राने दमदार कामगिरी केली आहे. आता टप्पा-२ राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत राज्यातही उर्वरित प्रत्येक ग्रामपंचायतीपर्यंत संपर्क यंत्रणा प्रस्थापित करण्यात यावी, असे निर्देश केंद्रीय दळणवळणमंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी मंगळवारी (दि. १) दिले.

सह्याद्री अतिथिगृह येथे मुंबईतील बीएसएनएलच्या मालमत्ता आणि महाराष्ट्रातील संपर्क यंत्रणाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी केंद्रीय मंत्री सिंधिया बोलत होते. या बैठकीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, मुख्य सचिव सुजाता सौनिक, केंद्रीय दूरसंचार सचिव नीरजकुमार, बीएसएनएलचे व्यवस्थापकीय संचालक रॉबर्ट रावी आदी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री सिंधिया म्हणाले, भारत नेट टप्पा-२ अंतर्गत फोर जी नेटवर्कचे देशभरात एक लाख टॉवर उभारण्यात येणार आहे. हे टॉवर प्रामुख्याने संपर्क नसलेल्या भागात उभारण्याचे नियोजन आहे. यामुळे राज्यात अतिदुर्गम भागातही चांगली संपर्क यंत्रणा निर्माण होईल.

ग्रामीण भागात सांगली संपर्क यंत्रणा निर्माण करण्यासाठी येत असलेले अडथळे दूर करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. राज्यामध्ये गडचिरोलीसह दुर्गम आणि अतिदुर्गम भागात संपर्क यंत्रणा निर्माण करण्यास राज्य शासन केंद्राला संपूर्ण सहकार्य करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## पेणमध्ये आदिवासींकडून जलस्रोताचे बळकटीकरण



**पेण : प्रतिनिधी**

गुढीपाडव्यानिमित्त सर्वत्र गुढी उभारून, शोभायात्रा काढून नववर्षाचे स्वागत होत असताना पेण तालुक्यातील उंबरमाळ आदिवासीवाडीतील ग्रामस्थ आणि ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांनी श्रमदानातून नैसर्गिक झऱ्याचे खोलीकरण व बळकटीकरण करीत नववर्षाची सुरुवात केली. दिवसभर श्रमदान करून उन्हाळ्यात भेडसावणाऱ्या पाणीटंचाईवर मात करण्याचा त्यांनी स्तुत्य प्रयत्न केला आहे.

सुमारे सव्वाशेच्या आसपास लोकसंख्या असलेल्या बोरगाव ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील उंबरमाळ आदिवासीवाडीत एकच विहीर आहे. त्यातील पाणीसाठा कमी झाल्याने येथील आदिवासी मंडळींना पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. हे लक्षात घेऊन ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर यांनी संस्थेच्या कार्यकर्त्यांसह वाडीतील सर्व ग्रामस्थांना एकत्रित करीत पाणी समस्येबाबत वाडीत बैठक घेतली. त्या बैठकीत आदिवासी बांधवांनी वाडीच्या खालच्या बाजूला साधारण पाचशे मीटर अंतरावर असलेल्या एका लहानशा झऱ्याला पाणी असल्याचे सुचविल्यानुसार गुढीपाडव्याच्या दिवशी सर्व ग्रामस्थ व संस्थेच्या कार्यकर्त्यांनी श्रमदानातून या झऱ्याचे खोलीकरण व बळकटीकरण केले.

या वेळी श्रमदानात सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांच्यासह राजू पाटील, सचिन पाटील, राजेश रसाळ, महेश पाटील, संजय वाघमारे, संतोष हिलम, सुनील वाघमारे, सतिश पवार, गीता वाघमारे, रेणुका हिलम, गणेश वाघमारे, निलम पवार, कृष्णा गोगरेकर, विनायक पवार, कमली हिलम, महेंद्र हिलम, सुरेखा वाघमारे, सुमन पवार, रुख्मिणी घोगरेकर यांच्यासह ग्रामस्थ सहभागी झाले होते.

या झऱ्याला आता भरपूर पाणी आले असून येथे विहीर बांधल्यास वाडीच्या पाण्याची समस्या कायमस्वरूपी सुटेल, असे या वेळी आदिवासी ग्रामस्थ यशवंत वाघमारे यांनी सांगितले.

## मच्छीमार नौकांसाठी डिझेल कोटा मंजूर

**मुंबई : प्रतिनिधी**


राज्याच्या सागरी जिल्ह्यांतील १३८ मच्छीमार सहकार संस्थांमधील सभासदांच्या एकूण सात हजार ७९६ यांत्रिकी मासेमारी नौकांना मार्च महिन्यासाठी एक लाख ६८ हजार १०९ कि.ली. इतका डिझेल कोटा मंजूर करण्यात आला आहे. याबाबतची माहिती मत्स्यव्यवसाय विभागाने दिली.

यामध्ये सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या रिअर क्राफ्ट ऑनलाईन प्रणालीनुसार नौकानोंदणी प्रमाणपत्र घेतलेल्या तसेच विधीग्राह्य मासेमारी परवाना असलेल्या अधिकृत मासेमारी नौकांनाच डिझेल कोटा अनुज्ञेय करण्यात आला आहे तसेच महाराष्ट्र सागरी नियमन अधिनियम १९८१ (सुधारित २०२१)च्या तरतुदींचा भंग करणाऱ्यांचे निलंबन करण्यात आले. याशिवाय गस्ती नौका व ड्रोन सर्वेक्षणामध्ये दोषी आढळलेल्या नौकांचा मासेमारी परवाना रद्द केला असून अशा नौकांना डिझेल कोटा देण्याचे प्रस्तावात समाविष्ट करण्यात आलेले नसल्याचेही मत्स्यव्यवसाय विभागाने कळविले आहे.

## पनवेल मनपाचा मालमत्ता करवसुलीचा विक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाने २०२४-२५ या आर्थिक वर्षात ४१२ कोटींची वसुली केली असून हा आजवरील सर्वाधिक वसुलीचा विक्रम आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा ५२ कोटी अधिक कर वसूल झाला आहे.



**एका वर्षात ४१२ कोटींचा तिजोरीत भरणा**

आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कर विभागाने वर्षभर नियोजनबद्ध पद्धतीने रूपरेषा आखली, तर या विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या नियंत्रणाखाली विविध उपाययोजना राबवल्या. गेला महिनाभरात उपायुक्त खारगे, कर अधीक्षक महेश गायकवाड व सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली चारही प्रभागामंध्ये कर्मचाऱ्यांनी नागरिकांना मालमत्ता कर भरण्यासाठी कोणतीही सुट्टी न घेता शनिवार, रविवारीदेखील कार्यालये सुरू ठेवली. पालिकेचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व्यवसायिक मालमत्ता करधारकांडून पालिकेने वसुलीची थेट कारवाई सुरू केली. या वसुलीसाठी महापालिकेच्या वतीने या वेळी १३ पथके तयार करण्यात आली होती. प्रभाग अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ही पथके सर्व प्रभागांमध्ये वसुलीसाठी जात होती.

विकासकामे करण्यासाठी महापालिकेकडे मालमत्ता कर हे महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन असल्याने वेळोवेळी सावध पावले उचलली गेली. महापालिकेचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून सिडको हस्तांतरीत भाग, औद्योगिक वसाहत, मार्बल मार्केट, जवाहर औद्योगिक वसाहत, तळोजा औद्योगिक वसाहत अशा भागांमध्ये व्यावसायिक व औद्योगिक मालमत्ता करधारकांकडून वसुलीची थेट कारवाई केली.

ज्या थकबाकीदारांना जप्तीच्या नोटीस दिल्या होत्या त्यांना वॉरंट नोटीस देण्याचे काम पालिकेने सुरू करून अटकावणीच्या मोहिमेलाही सुरुवात करण्यात आली. परिणामी मालमत्ता करामध्ये भरघोस वाढ होताना दिसली. मार्च महिन्यात दररोज एक ते पाच कोटी मालमत्ता कर महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला. **(पान २ वर..)**

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना

# कोकण विभागाची उत्तुंग भरारी

## १६ हजार युवकांना मिळाले काम; तीन हजारांहून उद्योजकांना कर्ज मंजूर

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासन उद्योग विभागाच्या महत्वकांक्षी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या माध्यमातून ३ हजाराहून अधिक उद्योजकांना कर्ज मंजूर झाले असून, यामधून सुमारे १६ हजाराहून अधिक युवांच्या हातांना काम मिळणार आहे. या योजने अंतर्गत कोकण विभागातील चार जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयांनी १००% पेक्षा अधिकची कामगिरी केली असून कोकण विभागाचे जिल्हा उद्योग केंद्र यंत्रणेचे २ हजार ७६० प्रकरणांचे उद्दीष्ट पूर्ण केले आहे.

चालू आर्थिक वर्षात कोकण विभागाकरिता ४ हजार ६०० प्रकरणांचे उद्दीष्ट दिले असून त्याअंतर्गत जिल्हा उद्योग केंद्र यंत्रणेला २ हजार ७६० प्रकरणांचे तर खादी व ग्रामोद्योग या यंत्रणेला १ हजार ८४० प्रकरणांचे उद्दीष्ट देण्यात आले होते. या अंतर्गत कोकण विभागाने एकूण ३ हजार २७३ कर्ज प्रकरणे मंजूर झाली असून यात रु.६१ कोटी इतक्या अनुदान रकमेचा समावेश आहे. कोकण विभागाने पाचही जिल्हयाच्या जिल्हा उद्योग केंद्र यंत्रणेला देण्यात आलेले एकूण उद्दीष्ट सलग दुसऱ्यांदा १०० टक्केपेक्षा अधिक कामगिरी करुन पूर्ण केले आहे.

तसेच विभागांतर्गतच्या रत्नागिरी जिल्हयाने जिल्हा उद्योग केंद्र यंत्रणेने– १५१.४६% व खादी व ग्रामोद्योग यंत्रणेने २८.१३% उद्दिष्ट पूर्तता करुन जिल्हयाचे एकूण उद्दीष्ट १०२.१३% नी पूर्ण केले आहे. जिल्हा उद्योग केंद्र सिंधुदुर्ग–१२५.८३%, पालघर–१०१% कार्यालयानेही सलग दुसऱ्या वर्षी अत्यंत भरीव कामगिरी केली आहे. याशिवाय रायगड जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयोनेही १०४.५% प्रकरणे मंजूर करुन प्रथमत:च १००% पेक्षा अधिकची कामगिरी करुन इतिहास रचला आहे. ठाणे जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाने ५४.०३% कामगिरी करत कोकण विभागाच्या एकूण उद्दीष्टामध्ये सहभाग नोंदविला आहे.

मंजूर प्रकरणांमध्ये १ हजार ८ घटक हे उत्पादन क्षेत्रातील असून २ हजार २६५ हे घटक सेवा क्षेत्रातील आहे. यात ५०% महिला व मागासवर्गीय उद्योग घटकांचा समावेश आहे. वरील कर्ज प्रकरणांमधून सुमारे १६ हजारांहून अधिक रोजगार निर्मिती होणार असून विभागातील रोजगार निर्मितीला मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे. याशिवाय रत्नागिरी जिल्हयांने ८३.३८% मार्जिन मनी दावे सादर करुन महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळविला आहे. या योजनेंतर्गत विभागामध्ये १००% पेक्षा अधिकची लक्षांकपूर्ती करुन विभागीय उद्योग सह संचालक कार्यालय व रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर या जिल्हयाने उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

भविष्यातदेखील कोकण विभाग आघाडीवर ठेवण्यासाठी प्रयत्न राहतील असे सहसंचालक यांनी सांगितले. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेकरिता सर्व प्रक्रिया पारदर्शक आणि ऑनलाईन पध्दतीने राबविण्यासाठी www.mah-cmegp.gov.in हे ऑनलाईन पोर्टल कार्यान्वित आहे.

## गोरक्षकांमुळे चोरीच्या १५ म्हशींची वाहतूक रोखण्यात यश

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीतून मुंबईकडे जाणारा एक आयशर टेम्पो मधून म्हशी कोंबून नेत असल्याचे गोरक्षकांनी पाहिले. त्यानंतर टेम्पो थांबवून चालकाची चौकशी केली असता त्या म्हशी चोरून विक्री साठी नेल्या जात असल्याचे उघड झाल्यानंतर कर्जत पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला असून त्या सर्व जखमी म्हशींवर उपचार करून त्यांची रवानगी गोशाळेत करण्यात आली आहे.

मुरबाड–कर्जत राष्ट्रीय महामार्ग रस्त्याने आयशर टेम्पो मधून दाटीवाटीने म्हशी नेल्या जात असल्याचे कडाव येथे आढळून आले होते. एम एच ०३, डी व्ही ८०११ या टेम्पो काही गोरक्षक यांनी थांबवला असता त्या म्हशी कोणत्याही वैद्यकीय प्रमाणपत्र विना आणि त्या टेम्पो मध्ये दाटीवाटीने कोंबून आणलेल्या म्हशी यांना चारा आणि पाण्याची कोणतेही व्यवस्था नव्हती. म्हशीबाबत माहिती विचारली असता टेम्पो चालक जाहिद हिद्दन करेशी याने आपण उत्तरप्रदेश येथील असून सध्या गोवंडी येथे राहत आहे गोवंडी येथील मोहम्मद बिलाल भाई मिया शेख याने सदरच्या म्हशी या नंदिनी गोशाळा मुरबाड तालुक्यातील साकूर्ती येथून न्यायला सांगितले होते अशी माहिती दिली.

सदरच्या म्हशीच्या मालकी बाबत चौकशी केली असता सदरच्या म्हशी ह्या मोहम्मद हसैन याकूब शाहब करेशी रा. कुरेशी नगर कुर्ला मुंबई यांचे मालकीचे असल्याचे असल्याची खोटी माहिती देऊन एका टेम्पो मधून त्या म्हशीची तस्करी केली जात असल्याचे दिसून आले.

त्यामुळे कोणत्याही परवाना विना चोरी करून नेल्या जात असलेल्या म्हशी यांची तस्करी केली जात असताना त्या म्हशी यांना दोराने बांधून नेले जात होते. कडाव येथील गोरक्षक आणि प्राणीमित्र यांनी त्या १५ म्हशी यांची तस्करी रोखली.

कर्जत पोलीस ठाणे येथे पोलिस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी गुन्हा दाखल करून घेण्याची कार्यवाही केली असून त्या म्हशींची किंमत साडे सात लाख इतकी लावण्यात आली आहे टेम्पाची किंमत पाच लाख असा साडे बारा लाखाचा ऐवज कर्जत पोलिसांनी ताब्यात घेतला.

# नवी मुंबई महापालिकेने पहिल्यांदाच ओलांडले ८०० कोटी करवसुली रकमेचे उद्दिष्ट

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेकडे मालमत्ताकर, पाणीपट्टी, बांधकाम परवानगी प्रस्ताव, परवाना शुल्क अशा विविध बाबींमधून जमा होणाऱ्या महसूलातूनच नागरी सेवासुविधांची परिपूर्ती केली जात असते. याकरिता सुजाण नवी मुंबईकर नागरिकांनी सहकार्य केल्यामुळे करवसूलीची बहुतांशी प्रमाणात उद्दीष्टपूर्ती झाली असून ८०० कोटी करवसूली रक्कमेचे उद्दिष्ट पुर्ण केल्याबद्दल महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी नवी मुंबईकर नागरिकांचे आभार व्यक्त केले आहेत.

यामध्ये मालमत्ता कर विभागाने ८२६.१२ कोटी इतका मालमत्ता कर जमा केला असून त्यामध्ये अभय योजनेव्दारे थकीत मालमत्ताकरावरील शास्ती रकमेवर ५० टक्क्यांच्या सूटीचा लाभ घेत २०.९७ कोटी इतकी रक्कम जमा झालेली आहेव तितक्याच रक्कमेची सवलत थकबाकीदारांना झाले आहे.त्याचप्रमाणे पाणीपुरवठा विभागामार्फत १०५.९३ कोटी इतकी रक्कम जल देयकांमार्फत जमा झालेली आहे. पाणी पुरवठा विभागामार्फत देण्यात आलेल्या अभय योजनेचा लाभही नागरिकांनी मोठया प्रमाणावर घेतला.

नगररचना विभागामार्फत बांधकाम परवानगी पोटी ३८१.९० कोटी इतके शुल्क जमा झाले असून यामध्ये पुनर्विकास प्रकल्प प्रस्तावांच्या मंजूरीचा मोठा भाग आहे.परवाना विभागानेही विविध परवानग्या विहित वेळेत दिल्याने १४.६० कोटी इतकी प्रत्यक्ष शुल्क जमा झालेली आहे.स्थानिक संस्था करापोटीही २८.०४ कोटी जमा झालेली आहे. तसेच इतरही विभागांमध्ये महसूल जमा होण्याचे प्रमाण लक्षणीय आहे.

सर्व विभागांनी १०० टक्के उद्दिष्टपूर्ती साध्य केली असून हे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागप्रमुख व त्या त्या विभागांचे अधिकारी –कर्मचारी यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न महत्वाचे आहेत. या सर्वच अधिकारी –



कर्मचारीवृंदाच्या उल्लेखनीय कामाची आयुक्तांनी प्रशंसा केली आहे. ही उद्दीष्टपूर्ती होण्यामागे महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ.कैलास शिंदे यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या प्रत्येक विभागाच्या आहे.

नागरिकांना सहजपणे आपली देयके भरता यावीत याकरिता आयुक्त महोदयांच्या संकल्पनेतून ऑनलाईन प्रणालीवर विशेष भर देण्यात आला. ऑनलाईन देयके भरताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी नविन ऑनलाईन मालमत्ता संकलन प्रणाली सुरु करण्यात आली. महानगरपालिकेच्या संकेतस्थळाप्रमाणेच स्वतंत्र प कार्यान्वित करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. नेटबॅकींग, डेबिट/क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, क्यू आर कोड तसेच महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात रोख / धनादेश / डीडी अशी विविध माध्यमे देयके भरणा करण्यासाठी उपलब्ध असल्याने तसेच ऑनलाईन प्रणालीव्दारे घरबसल्या देयके अदायगीची सुविधा लाभल्याने नागरिकांकडून उत्तम प्रतिसाद लाभला. यासोबतच मालमत्ता कर व पाणीपट्टी थकबाकीदारांना नोटीसा देणे, त्यांचे नळ कनेक्शन बंद करणे अशी कारवाई देखील करण्यात आली.

शहरातील प्रकल्प व सुविधा कामांचा दर्जा अधिक उत्तम राखण्यासाठी महानगरपालिकेकडे जमा होणारा महसूल अत्यंत महत्वाचा असून सामाजिक जबाबदारीच्या भावनेने विहित वेळेत करभरणा करणाऱ्या व इतरही बाबींमध्ये महानगरपालिकेच्या महसूल वाढीला सहकार्य करणाऱ्या जागरुक नवी मुंबईकर नागरिकांचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी आभार व्यक्त केले आहेत.

या वर्षात सुरू असलेल्या ऑनलाइन पेमेंट सुविधांमध्ये लवकरच भारत बिल पेमंट सिस्टीमची भर घालण्यात येत असून नागरिकांना अत्यंत सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यासोबतच मालमत्ताकराचे वर्षभराचे एक देयक अदा केले जाणार असून नागरिक वर्षभरात टप्प्याटप्प्याने देयक रक्कम भरू शकतात. त्याचप्रमाणे पाणी देयकेही ऑनलाईन उपलब्ध होणार असून सर्व पेंमेंट सुविधेव्दारे ती भरणा करता येतील. तरी यापुढील काळातही अशाच प्रकारचे सहकार्य नागरिकांकडून लाभेल असा विश्वास आयुक्तांनी व्यक्त केला आहे.

# उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर महानिर्मिती सज्ज

**मुंबई : प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विजेची मागणी वाढते, यासाठी दरवर्षी महानिर्मितीतर्फे सूक्ष्म नियोजन करण्यात येते. सद्य स्थितीत राज्याची विजेची एकूण मागणी २९,५०० मेगावॅटच्या घरात पोहोचली असून यासाठी महानिर्मिती सज्ज आहे.

महानिर्मितीने मार्च २०२५ मध्ये मासिक औष्णिक महत्तम ५,३२८ दशलक्ष युनिट्स इतके विक्रमी वीज उत्पादन केले तर उरण वायू वीज केंद्राने मागील ५ वर्षांतील सर्वात जास्त म्हणजे २,४७३ दशलक्ष युनिट्स वीज उत्पादन केले आहे. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने सन २०२४–२५मध्ये निर्धारित केलेल्या लक्ष्यास अनुसरून महानिर्मितीच्या अपारंपारिक ऊर्जा, पुणे मंडळाने ४५४.४० दशलक्ष युनिट्स वीज उत्पादनाचे लक्ष्य गाठले आहे. एकूणच सन २०२४–२५ या आर्थिक वर्षात ६१,४५६ दशलक्ष युनिट्स इतकी विक्रमी वीजनिर्मिती झाली असून सन २०२३–२४ चा ६१,४३९ दशलक्ष युनिट्स वीजनिर्मितीचा विक्रम तोडला आहे, हे विशेष.

महानिर्मितीने सातत्याने उच्चतम कामगिरी नोंदवत अनेक उच्चांक गाठले आहेत. औष्णिक संचांची उपलब्धता, आवश्यक देखभाल–दुरुस्ती, भांडवली स्वरूपाची कामे याकडे विशेष भर दिल्याने यावर्षी महानिर्मितीच्या १५ संचांतून १०० दिवसांपेक्षा जास्त अखंडित वीज उत्पादन झालेले आहे.

प्रभावी इंधन व्यवस्थापनाची जोड दिल्याने वीज उत्पादनासाठी सुमारे २२.५ लक्ष मेट्रिक टन इतका कोळसा साठा सद्य परिस्थितीत उपलब्ध आहे आणि त्यामध्ये सातत्याने वाढ करण्यासाठी महानिर्मितीचा विविध स्तरावर पाठपुरावा विशेषतः कोळसा मंत्रालय, कोळसा कंपन्या आणि रेल्वे प्रशासनासोबत समन्वय सुरु आहे. यंदा वीज उत्पादनासाठी आवश्यक जल साठा संबंधित धरणांमध्ये पुरेसा उपलब्ध असल्याने आगामी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील जनतेला आवश्यक मागणीनुसार अखंडित वीज उत्पादन करण्यासाठी महानिर्मिती प्रयत्नशील आहे.

राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांचे निर्देशानुसार महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, संचालक मंडळ आणि अधिकारी– तंत्रज्ञ–कर्मचारी राज्यातील जनतेला मागणीनुसार अखंडित वीज उत्पादन देण्यासाठी कटिबद्ध आहेत.

## पनवेल महानगरपालिका अतिरिक्त आयुक्तपदी गणेश शेटे रुजू



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विभागीय आयुक्त कार्यालय कोकण विभाग येथे उपायुक्त असलेले तथा महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील मुख्याधिकारी, गट–अ संवर्गातील उपायुक्त गणेश शेटे यांची पनवेल महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त, या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली असून मंगळवारी त्यांनी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांची त्यांनी मुख्यालयात भेट घेऊन अतिरीक्त आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारला. यावेळी सर्वांच्या वतीने आयुक्तांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

यापूर्वी श्री.शेटे यांनी पनवेल महानगरपालिकेच्या उपायुक्तपदी कार्य केलेले आहे. त्यावेळी महापालिकेचा मालमत्ता कर हा विभाग त्यांच्याकडे होता. त्यादरम्यान त्यांनी हा विभाग अधिकाधिक जनताभिमुख कसा होईल यासाठी विशेष प्रयत्न केले होते.

## महाबळेश्वर पर्यटन महोत्सव बोधचिन्हाचे अनावरण

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागांतर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व स्थानिक जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी २ ते ४ मे २०२५ या कालावधीत तीन दिवस महाबळेश्वर पर्यटन महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे महाबळेश्वर पर्यटन महोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज सूर्यवंशी, पर्यटन संचालक डॉ. बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, एमटीडीसीचे मुख्य लेखा वित्त अधिकारी जितेंद्र सोनवणे उपस्थित होते.

पान १ वरुन

## पनवेल मनपाचा मालमत्ता करवसुलीचा विक्रम

१९ मार्च रोजी महापालिकेने मागील वर्षाचा विक्रम मोडित काढत विक्रमी वसुली केली. मागील वर्षी ३१ मार्चअखेर एकूण ३६० कोटींचा भरणा झाला होता. हा विक्रम या वर्षी १० दिवस आधीच मोडित काढण्यात आला, तर यंदाच्या वर्षाअखेर ४१२ कोटी रुपये मालमत्ता कराच्या स्वरूपात जमा झाले आहेत.

वेळोवेळी महापालिकेने मालमत्ताधारकांच्या आक्षेप व हरकतीनुसार त्यांच्या बिलात सुधारणा करुन दिली आहे. याचबरोबर यापुढेही मालमत्ताधारकांना त्यांच्या बिलाबाबत कोणत्याही हरकती किंवा सूचना असल्यास त्यानुसार त्यांच्या बिलात सुधारणा करण्याची भूमिका महापालिकेने घेतली आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या सूचना किंवा आक्षेप असल्यास तो नोंदवावा आणि आपला मालमत्ता कर भरून पनवेलच्या विकासाला हातभार लावावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.



## गुढीपाडव्यानिमित्त कार्यक्रम

**रोहे : प्रतिनिधी**

श्री विठ्ठल रखुमाई आगरी युवक मंडळ घोसाळे तथा श्री शिवशंभू आगरी युवक मंडळ मुंबई यांच्या सौजन्याने रविवारी गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर श्री सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली. या वेळी श्री अभिजित जोशी व पूजेचे मानकरी म्हणून श्री/सौ रसिका सुधिर भगत उपस्थित होते. या प्रसंगी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. भक्ती संगिताचा कार्यक्रम – गुढीपाडवा पहाट, मुलांसाठी चित्रकला व काव्यगायन स्पर्धा,मनोरंजक खेळ, गुणगौरव सोहळा, महिलांसाठी हळदी कुंकू आदी कार्यक्रमांची रेलचल पाहायला मिळाली.

रात्री १० वाजता साईराज डान्स अकॅडमी रोहा व स्थानिक कलाकार नृत्याविष्कार स्पर्धा आयोजित करण्यात आली. यामध्ये साईराज डान्स अकॅडमी व स्थानिक कलाकार यांनी विविध प्रकारची नृत्य सादर केली. प्रेक्षकांनी त्यांस भरभरून प्रतिसाद दिला.

कार्यक्रमांस अध्यक्ष किसन भगत व मुंबईकर मंडळाचे अध्यक्ष किशोर फुलारे स्थानिक व मुंबईच्या मंडळाचे सर्व सभासद आपल्या कुटुंबियांसमवेत उपस्थित होते.

## सलग सुट्टीतही माथेरान मात्र शांत!

**खोपोली : प्रतिनिधी**

मार्च महिन्याच्या शेवटी सलग सुट्ट्या असतानाही माथेरान मध्ये मात्र काल रात्री शुकशुकाट होता, त्यामुळे व्यापारी वर्गाला व छोट्या छोट्या व्यवसायिकांना हा धक्का होता.



शनिवार रविवारी माथेरान मध्ये मोठी गर्दी पाहावयास मिळते परंतु या वेळेस सलग सुट्ट्यांचे वार असतानाही माथेरान मध्ये रविवारी चक्क स्मशान शांतता पहावयास मिळाली, कदाचित विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू असल्यामुळे पर्यटकांनी पाठ फिरवली असेल. अशी ही व्यापारींमध्ये चर्चा होते.

मुंबईकरांना वीकेंडला मौज मजा करण्यासाठी व सुट्टीचा आनंद घेण्यासाठी सर्वात जवळचे पर्यटन स्थळ म्हणजेच माथेरान. या ठिकाणचे निसर्ग सौंदर्य पाहण्यासाठी पर्यटक उत्सुक असतात. दर शनिवार रविवारी इथे गर्दी असते तर आता परीक्षा संपत आले असल्याने विद्यार्थी सह पालक वर्गांची सुद्धा माथेरानमध्ये गर्दी असते. त्यामुळे येथील पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या छोट्या छोट्या व्यवसायिकांना पर्यटकांच्या आगमनाने दिलासा मिळतो. परंतु मार्च महिन्याच्या येणाऱ्या शनिवारी रविवारी मात्र व्यवसायिकांना शांत बसावे लागले. त्यामुळे व्यवसायिकांमध्ये थोडेसे चिंतेचे वातावरण दिसून आले.

अलीकडेच स्थानिक व बाहेरचे अश्वपाल यांचे आवास्तव भाडे आकारल्याच्या पार्श्वभूमीवर एक दिवसाचे बंद पुकारले होते, त्याला स्थानिक व्यापाऱ्यांसह पर्यटकांनी पाठिंबा दर्शविला होता. दरम्यान प्रशासन स्थानिक आमदारानी लक्ष घालून हा वाद मिटविला. त्यामुळे आगामी काळात पर्यटकांना अल्प दरात सेवा मिळतील अशी आशा पर्यटक व्यक्त करीत आहे.

# खांदा कॉलनीत लाखोंची घरफोडी

**पनवेल : वार्ताहर**

खांदा कॉलनी, सेक्टर-७ मधील निलकंठ दर्शन सोसायटीमधील बंद घराचा कडीकोयंडा तोडून अज्ञात चोरट्यांनी या घरातील तब्बल ४.३८ लाख रुपये किंमतीचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली आहे. खांदेश्वर पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.



या प्रकरणातील तक्रारदार दैवशाला कसबे (वय ३८) या खांदा कॉलनी, सेक्टर-७ मधील निलकंठ दर्शन सोसायटीमध्ये कुटुंबासह राहण्यास आहेत. दैवशाला कसबे या नेहमीप्रमाणे चेंबूर येथे कामावर गेल्या होत्या. या वेळी त्यांचे पती घरीच होते. मात्र, ११ वाजता ते त्यांची कार वाशी गाव येथे दुरुस्तीसाठी घेऊन गेले होते. जाताना त्यांनी घराच्या मेन दरवाजाला कुलुप लावले होते. यादरम्यान चोरट्यांनी संधी साधून कसबे यांच्या घराचा कडी-कोयंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे ४.३८ लाख रुपये किंमतीचे दागिने चोरून नेले.

दरम्यान, दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास दैवशाला कसबे या कामावरुन घरी परतल्या असता, त्यांना दरवाजाचा कडी-कोयंडा तुटल्याचे निदर्शनास आले. तसेच घरातील कपाटाचे लॉक तोडून लॉकरमध्ये असलेले सर्व दागिने चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी आपल्या पतीला संपर्क साधून घडल्या प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर त्यांनी खांदेश्वर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

# बनावट पावतीद्वारे ग्राहकाची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

गाडी खरेदी करण्याकरिता ग्राहकाकडून रक्कम घेऊन ही रक्कम शोरूममध्ये जमा न करता त्या रक्कमेच्या शोरूमच्या नावाने बनावट रिसीट (पावती) बनवून व आलेली रक्कम ऑनलाईन जुगार खेळून खर्च केल्याप्रकरणी जवळपास नऊ लाख ७० हजाराची फसवणूक झाल्याची घटना एका ग्राहकाची घडली असून याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




स्वप्नील क्षीरसागर यांनी गारनेट मोटर्स पनवेल या स्कोडा कारच्या शोरुममध्ये सेल्स एक्झिक्युटीव्ह म्हणून काम पाहणारा सागर चव्हाण याला स्कोडा कुशाक गाडी खरेदीकरिता जवळपास नऊ लाख ७० हजार ६९९ रुपये देण्यात आले होते.

ही रक्कम त्याने शोरूममध्ये जमा न करता त्या रक्कमेच्या शोरूमच्या नावाने बनावट रिसीट बनवून व आलेली रक्कम ऑनलाईन जुगार खेळून खर्च केल्याप्रकरणी जवळपास नऊ लाख ७० हजाराची फसवणूक झाल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# संरक्षक लोखंडी पत्र्याची चोरी; त्रिकूट जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

कर्नाळा अभयारण्यात प्राण्यांच्या संरक्षणासाठी लावलेले लोखंडी पत्रे (नॉईज बॅरियर) चोरण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले आहे. एजाज अहमद मोमीन आलम शेख (२६ कोन, मूळ-उत्तरप्रदेश), रोजअली मुसताक खान (२२ पळस्पे), रईस सलारु खान (३७ पळस्पे) या तिघांना कोनगांव परिसरातून ताब्यात घेण्यात आले आहे.



माकड आणि इतर प्राणी रस्त्यावर येऊ नये म्हणून सदर प्राण्यांच्या संरक्षणासाठी कर्नाळा अभयारण्य परिसरात उंच लोखंडी पत्रे बॉक्स लावण्यात आले आहेत. कर्नाळा अभयारण्य येथे प्राण्यांच्या संरक्षणासाठी लावलेले सदर लोखंडी पत्रे (बॉक्स) चोरुन ते पळवून नेताना टेम्पो (एमएच ४६ बीएम ०४७४) जागरुक वाहन चालकांनी पकडला. या वेळी चोर जंगलातील दाट अंधाराचा फायदा घेत संरक्षण भिंतीवरुन उडी मारून जंगलात पळून गेले होते.

या प्रकाराची माहिती पनवेल तालुका पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत टेम्पो ताब्यात घेतला. चोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर यातील तीनही आरोपींना ताब्यात घेतले. आरोपी भंगार वेचणारे आणि भंगार विक्रेते असल्याची माहिती तालुका पोलिसांनी दिली.

# पत्नीच्या छळाला कंटाळून पतीची आत्महत्या

**पनवेल : वार्ताहर**

उलवे सेक्टर २४मध्ये राहणाऱ्या राज बाळकृष्ण पोकळे या २८ वर्षीय विवाहित तरुणाने पत्नीकडून होत असलेल्या मानसिक छळाला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. त्यानुसार उलवे पोलिसांनी मृत तरुणाची पत्नी अक्षता गणेश चौलकर (वय २८) हिच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त करणे तसेच पती जिवंत असताना, दुसरे लग्न करणे या कलमाखाली गुन्हा दाखल करुन पुढील कार्यवाईला सुरुवात केली आहे.



मृत राज पोकळे आणि त्याची पत्नी अक्षता दोघेही उलवे, सेक्टर-२४ मधील महाविर साई सुरत बिल्डींगमध्ये राहत होते. या कालावधीत अक्षताने दुसऱ्या व्यक्तीसोबत अनैतिक संबंध सुरु होते. त्यामुळे तिने पती राज याला मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली होती तसेच अक्षताने पती राज जिवंत असताना त्याच्याशी घटस्फोट न घेता, तिचे प्रेमसंबंध असलेल्या व्यक्तीसोबत विवाह करण्यासाठी रजिस्टर कार्यालयात नोंदणी केली होती. त्यामुळे मानसिक तणावाखाली आलेल्या राज पोकळे याने २४ जानेवारी रोजी दुपारी उलवे येथील घरामध्ये आत्महत्या केली होती. उलवे पोलीस ठाण्यात याबाबत अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाचा तपास केला.

यादरम्यान, राज पोकळे याने पत्नीकडून होत असलेल्या मानसिक छळामुळे आत्महत्या केल्याचे उघडकीस आले. त्यानुसार उलवे पोलिसांनी मृत राज पोकळे याच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून अक्षता चौलकर हिच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे तसेच पुढील कारवाईला सुरुवात केली आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेमध्ये सहभाग

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मॅनेजमेंट स्टडीज व कॉमर्स अँड अकाउंटन्सी विभागातील विद्यार्थी तसेच प्राध्यापकांनी टिळक एस.के. कॉलेज सीवूड येथे शनिवारी (दि.२९) ब्रिजिंग रिसर्च अँड सस्टनेबिलिटी या विषयावर आयोजित केलेल्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभाग घेतला.

महाविद्यालयातील मॅनेजमेंट स्टडीज विभागातील प्रथम वर्षाच्या आकांक्षा कारंडे, मनीषा करोतरा, प्रा. डॉ. रीत थुले, प्रा. रेवान शिंदे प्रा. स्नेहा नाईक व प्रा. प्रमोद वाघे यांनी एचआर व मार्केटिंग तसेच कॉमर्स व अकाउंटन्सी या विषयावर संशोधन लेख लिहून ते या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये वेगवेगळी सादरीकरण कौशल्ये वापरून उत्कृष्टरित्या सादर केले. मॅनेजमेंट स्टडीज विभागातील प्राध्यापकांचे संशोधन लेख लिहिण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन मिळाले. प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे यांनी अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.







**नवीन पनवेल : डॉ. गोपाळ शितोळे आणि डॉ. सोनिया केकाणे-शितोळे यांनी सुरू केलेल्या श्री स्वामी समर्थ डेंटल क्लिनिकचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले तसेच या क्लिनिकला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर आदींनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक राजू सोनी, समीर ठाकूर, भाजप महिला नेत्या सुहासिनी केकाणे, राजेंद्र भामरे, मयुर भुजबळ, प्रफुल्ल वानखेडे, अभिजित कारंडे, ॲड. काशिद, निलेश झालटे, विनायक पाटील, निलेश नलावडे, योगेश कडूसकर आदी उपस्थित होते.**

## निवडक

### डंपरच्या धडकेने कामगाराचा मृत्यू

**पनवेल :** डंपरच्या धडकेने एका कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना गव्हाण फाटा परिसरात घडली आहे. या ठिकाणी काम चालू असलेल्या साईटवर गव्हाण फाट्याजवळील जुना रोडवर चंदन जगबहादूर राम (वय ३१) त्या ठिकाणी हा काम करीत असताना मातीचा भराव करण्यासाठी माती भरून आलेल्या डंपरवरील चालकाने तो चालवित असलेला डंपर हा माती टाकण्यासाठी पाठीमागे रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून जोरात रिव्हर्स चालवित होता. या वेळी त्या डंपरची धडक या कामगाराला बसली. त्यात तो जमिनीखाली पडून मातीने भरलेल्या डंपरचे चाक त्याच्या अंगावरून गेल्याने त्यात तो दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### सात वर्षीय शगुफ्ताचे रोजे पूर्ण

**पनवेल** : येथील पटेल मोहोल्ल्यातील शगुफ्ता सोहेल सोलकर या सात वर्षीय मुलीने पवित्र रमजानचे सर्व रोजे पूर्ण केल्याने तिचे कुटुंबातून व नातेवाईकांकडून विशेष कौतुक व अभिनंदन होत आहे. मार्च महिन्याच्या कडक उष्म्याने नागरिक हैराण होत होते. या परिस्थितीत शगुफ्ताने या वयात रमजानचे सर्व रोजे यशस्वीरीत्या पूर्ण केले.



# 'रयत'च्या उत्तर विभागीय समितीकडून गव्हाण विद्यालयाचे पुनर्मूल्यांकन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेतील शाखांना कर्मवीर पारितोषिके प्रदान करण्यासाठी पुनर्मूल्यांकनार्थ नेमलेल्या संस्थेच्या अहिल्यानगर,उत्तर विभागाच्या पथकाकडून गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये मंगळवारी (दि.१) पुनर्मूल्यांकन पथक पर्यवेक्षण संपन्न झाले.



संस्थेच्या नियमित पथक पर्यवेक्षणांमधून सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या निवडक शाखांचे कर्मवीर पारितोषिकासाठी संस्थेने पूनर्मूल्यांकन करण्यासाठी समिती गठीत केली. यात गव्हाण शाखेचा समावेश झाला आहे.

या वेळी पुनर्मूल्यांकन समिती अर्थात पथकाचे प्रमुख रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य बाजीराव कोरडे, पथकाचे कार्यकारी प्रमुख रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभाग, अहिल्यानगरचे सहायक विभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी तसेच पथकातील इतर सदस्य मिरी शाखेचे मुख्याध्यापक गंगाधर ढोले, पोहेगाव शाखेचे उपशिक्षक राकेश खैरनार, अस्तगाव शाखेचे लेखनिक किरण कोळपे या उत्तर विभागातील पथकाने विद्यालयाचे अंतर्बाह्य फेरमूल्यांकन करून गुणवत्ता वृद्धीसाठी महत्वपूर्ण सूचना केल्या.

प्रारंभी विद्यालयाच्या वतीने पथकातील सर्व सदस्यांच्या शुभहस्ते संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील व रयत माऊली लक्ष्मी वहिनी यांना प्रतिमापूजनाने अभिवादन करण्यात आले. या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रविंद्र भोईर, डोळखांब शाखेचे उपशिक्षक सतिश गोर्डे, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख बाबुलाल पाटोळे, विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, राजेंद्र चौधरी, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील आदी उपस्थित होते.

पथक प्रमुख, कार्यकारी प्रमुख व पथकातील इतर सर्व सदस्यांनी शाळेचे अंतर्बाह्य फेरमूल्यांकन केल्यानंतर समारोप समारंभात पथक प्रमुख व संस्थेचे जनरल बॉडी सदस्य बाजीराव कोरडे, कार्यकारी प्रमुख उत्तर विभागाचे सहायक विभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी व मिरी शाखेचे मुख्याध्यापक गंगाधर ढोले आदींनी शाळेच्या भौतिक व अनुषंगिक सुविधांबद्दल समाधान व्यक्त करून गुणवत्ता वृद्धीसाठी महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

या वेळी सर्व मान्यवरांनी विद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांच्या विषयी विद्यालयास सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रशंसोद्गार काढले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांचेही समयोचित भाषण झाले. समारंभाचे प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी केले तर संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर यांनी आभार मानले. गव्हाण विद्यालयाचे पथक पर्यवेक्षण झाल्यानंतर संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या पुनर्मूल्यांकनासाठी पथक रवाना झाले.

# राजेंद्र कदम सहाय्यक पोलीस आयुक्तपदी

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम यांची ठाणे शहर सहायक पोलीस आयुक्तपदी पदोन्नतीने नियुक्ती झाली. याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



श्री. कदम यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाली. निवडीनंतर त्यांनी मुंबई, नवी मुंबई, वाशी, कल्याण याठिकाणी सेवा बजावली. गुन्हेगारांच्या मुसक्या आवळून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी त्यांनी यशस्वी कामगिरी केली. या निवडीबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले.








**पनवेल : गुढीपाडव्यानिमित्त नववर्ष स्वागत समिती विचुंबे, देवद व उसर्ली यांच्या वतीने भव्य शोभायात्रा आयोजित करण्यात आली होती. या वेळी सरपंच प्रमोद भिंगारकर, उपसरपंच रवींद्र भोईर, जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, माजी ग्रामपंचायत सरपंच बळीराम पाटील, ग्रामपंचायत सदस्य अनिल भोईर, भरत पाटील, अनंता गायकवाड, आनंद गोंधळी, विभूती सुरते, प्रगती गोंधळी, श्रावणी भोईर, आरती गायकवाड, गुरूनाथ म्हात्रे, प्रमिला म्हात्रे, ग्रामस्थ व विविध सोसायट्यांचे पदाधिकारी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. या वेळी महिला, युवक-युवतींची उपस्थिती लक्षणीय होती.**

# युईएस स्कूलमध्ये गुढीपाडवा उत्साहात

**उरण : वार्ताहर**

युईएस. लिटिल सिड्स इंटरनॅशनल प्री-स्कूल मध्ये गुढीपाडवा उत्साहात साजरा करण्यात आला. युईएस संस्थेचे अध्यक्ष उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर यांनी दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर सरस्वती मंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ गुढी उभारून पुजा केली.

या वेळी त्यांच्यासोबत संस्थेचे मानद सचिव आनंद भिंगार्डे, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता, स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सिमरन दहिया, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख, माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका, समन्वयक तसेच शिक्षक गण व पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.





कार्यक्रमाच्या सुरुवातीला एका शिक्षिकेने गुढीपाडव्याचे महत्व सांगितले. त्यानंतर संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर यांनी सर्व उपस्थितांना पाडव्याच्या आणि नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. संगीत शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांनी सरस्वती वंदना म्हटली. त्यानंतर सिनिअर के. जी. च्या विद्यार्थ्यांनी सर्व उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

दरवर्षीप्रमाणे ह्यावर्षीही गुढीपाडव्याच्या दिवशी नव्याने प्रवेश घेतलेल्या पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांकडून पाटीवर सरस्वीतचं चित्र काढायला लावून त्यावर फुले व हळद कुंकू वाहून पाटीपूजन करायला सांगण्यात आले. रांगोळी, सजावट व सर्व उपस्थितांचे स्वागत, कार्यक्रमाचं सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन पूर्व प्राथमिक विभागातील शिक्षकांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेतर्फे विद्यार्थी व पालकांना मिठाई तसेच नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रम असलेला एनईपी पुस्तकांचा संच व स्कूल बॅग देण्यात आली. अशा रितीने युईएस लिटिल सिड्स इंटरनॅशनल प्री-स्कूलमध्ये गुढीपाडवा उत्साहात करण्यात आला.

## संपादकीय

# अमेरिकेत मंदीची शक्यता

**डोनाल्ड ट्रम्प पुन्हा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदी आल्यापासून त्यांनी आक्रमक व्यापार धोरण अनुसरले आहे. परिणामस्वरूपी अमेरिकेच्या शेअर बाजारात मोठी घसरण तर सुरू झालीच, पण अमेरिकी अर्थव्यवस्थेत मंदी येण्याची चिन्हेही दिसू लागली आहेत. याचे परिणाम संपूर्ण जगभरासह भारतावरही होणार हे उघड आहेच. जगभरातील अनिश्चिततेमुळे गुंतवणूकदार सुरक्षित पर्याय म्हणून सोन्याकडे वळल्याने सोन्याचे भाव वाढत आहेत आणि वाढतच जाणार असल्याचेही सांगितले जाते आहे.**

अमेरिकी नागरिकांनी गेल्या वर्षीच्या नोव्हेंबर महिन्यात देशातील अध्यक्षीय निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांच्या बाजूने कौल दिला तेव्हा त्यांनी बदल्यात आज दिसते ती परिस्थिती मिळणार आहे याची कल्पना केली नव्हती. सध्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कामगिरीविषयी अमेरिकनांमध्ये वाढती नाराजी असल्याचे तेथील काही पाहणी अहवालांमधून दिसते आहे. गेल्या पंधरा वर्षात कधीही नव्हते इतके सध्या अमेरिकेत बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. स्वाभाविकच अमेरिकन लोक सध्या अतिशय जपून खर्च करताना दिसत आहेत. याचा अर्थातच त्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर व शेअरबाजारावर परिणाम होतो आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या आक्रमक व्यापार धोरणांचे परिणाम अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर होणार हे तर उघडच होते. परंतु दूरवरचे वाटणारे हे संकट आता बऱ्यापैकी समीप आल्याचे स्पष्ट दिसते आहे. इन्व्हेस्टमेंट बँक गोल्डमन सॅक्सने अमेरिकेतील मंदीची शक्यता आता २० टक्क्यांवरून ३५ टक्क्यांवर नेली आहे. ट्रम्प यांच्या ज्यादा आयात शुल्क आकारणीच्या घोषणेमुळे जागतिक पातळीवर अनिश्चितता निर्माण झालीच आहे, पण अमेरिकेत उत्पादनापासून रोजगारांपर्यंत आणि महागाई तसेच विनिमय दरांपर्यंत प्रत्येक गोष्टीवर याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. आता २ व ३ एप्रिलला ही आयात शुल्क आकारणी प्रत्यक्षात सुरू झाल्यावर अमेरिकेतील महागाईत लक्षणीय वाढ होण्याची भीती आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक देशांवर २ एप्रिलपासून परस्पर समान आयात शुल्क आकारणी करण्याची घोषणा केली आहे. याचा फटका जसा अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला बसतो आहे, तसाच तो जगभरातील भांडवली बाजारांना देखील बसतो आहे. वास्तविक यामुळेच गुंतवणूकदार सुरक्षित पर्याय असलेल्या सोन्याकडे वळत आहेत व त्यातूनच सोन्याच्या भावातील वाढीचे चक्र कायम राहिले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याच्या भावाने सोमवारी ऐतिहासिक उच्चांकी पातळी गाठली. आंतरराष्ट्रीय वायदे बाजारात सोन्याचा भाव सोमवारी प्रतिऔंस ३१२८ डॉलरवर पोहोचला. जागतिक अर्थव्यवस्थेत सातत्याने घसरण सुरू आहे. तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा भाव सातत्याने वाढतो आहे. चालू वर्षाची पहिली तिमाही मार्च अखेरीस संपली. या काळात सोन्याच्या भावात झालेली वाढ ही १९८६ नंतरची सर्वाधिक भाववाढ ठरली आहे. या वर्षी आतापर्यंत सोन्याच्या भावात १८ टक्के वाढ नोंदली गेली आहे. गेल्या वर्षभरात सोन्याच्या भावात २७ टक्के वाढ झाली होती. येत्या काळातही सोन्याच्या भावातील ही वाढ कायम राहण्याचा अंदाज व्यक्त केला जातो आहे. सगळीकडून धोक्याचे इशारे मिळत असूनही ट्रम्प आपल्या आयात शुल्कविषयक आक्रमक धोरणावर ठाम राहिल्यास सध्याच्या परिस्थितीतून बचावाची शक्यता धूसर होत जाईल. या वाढीव आयात शुल्कांमुळे अमेरिकेत महागाई वाढेल, पर्यायाने मागणी कमी होईल. याचा थेट परिणाम तेथील उत्पादनावर व रोजगारांवर होण्याची शक्यता वर्तवली जाते आहे. भारताला या साऱ्या परिस्थितीकडे बारकाईने लक्ष द्यावे लागणार आहे.

# भारतीय रिझर्व्ह बँक देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा

भारतीय रिझर्व्ह बँकेचा ९०वा वर्धापन दिन मंगळवारी साजरा झाला. १ एप्रिल १९३५ रोजी या बँकेची स्थापना भारतीय रिझर्व्ह बँक कायदा १९३४नुसार झाली होती. भारतीय रिझर्व्ह बँकेने रचना आणि दृष्टिकोन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दि प्रॉब्लेम ऑफ रुपी : इट्स ओरिजिन अँड इट्स सोलुशन या पुस्तकातून घेतले आणि हिल्टन यंग आयोगाकडे सादर केले. या बँकेची संस्थापना १९२६च्या रॉयल संस्थेच्या शिफारशीच्या आधारे झाली.



भारतीय रिझर्व्ह बँकेची कार्ये आणि भूमिका भारताच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यात मोठी भूमिका बजावतात. तिच्या काही भूमिकांमध्ये नोटांच्या समस्यांचे नियमन करणे, आर्थिक स्थिरता सुनिश्चित करणे आणि देशाचे चलन आणि त्याची पत व्यवस्था चालवणे समाविष्ट आहे.

भारतीय रिझर्व्ह बँक ही देशाच्या वित्तीय व्यवस्थेचा कणा आहे. जनतेने आणि सरकारने बाजारात पैशाच्या प्रवाहाचे नियंत्रण, देखरेख आणि प्रोत्साहन देण्याची जबाबदारी तिच्यावर सोपवली आहे. देशाची आर्थिक स्थिरता राखण्यासाठी आणि देशाला विकासाकडे नेण्यासाठी नियोजन आणि विकासासाठी ती भाग घेते.

भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना १९३५मध्ये झाली आणि तेव्हा पासून ती देशातील भारतीय रुपयाच्या प्रवाहाचे नियमन करत आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या विविध धोरणे आणि दिशा निर्दे शांद्वारे इतर व्यावसायिक बँकांचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी देखील बँकेवर आहे.

देशाच्या आर्थिक स्थितीचा कणा असल्याने तिची विविध उद्दिष्टे आहेत. त्यात बँक नोटांच्या समस्येवर लक्ष्य देते. देशात आर्थिक स्थिरता राखणे, देशातील पत व्यवस्था आणि चलन स्वतः च्या फायद्यासाठी चालणे हे आहे. आर्थिक स्थिरता राखण्यासाठी आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी रिझर्व्ह बँकेने कोणत्याही दबावापासून मुक्त राहावे आणि भ्रष्ट कारवायांपासून दूर राहावे. एक केंद्रीय प्राधिकरण म्हणून काम करणे तसेच इतर सर्व सार्वजनिक बँकांची बँक व नोटा जरी करण्याचा अधिकार भारत सरकारची बँक तिचे काम आहे तसेच बँकेने किंमत स्थिरता राखण्यासोबतच तशा धोरणांची रचना करावी जी आर्थिक वाढीला चालना देतील.

देशासाठी तयार केलेल्या चलन विषयक धोरणांचे नियोजन आणि देखरेख बँक करते. यातील उद्देश असा आहे की प्रत्येक धोरण वाढीचा विचार लक्षात घेऊन तयार केले जावे आणि त्याच वेळी किंमत स्थिरतादेखील राखली गेली पाहिजे.

देशातील सर्व बँकांनी कोणत्या पॅरामीटर्स अंतर्गत काम करावे हे ते डिझाईन करते. ह्यातील मुख्य उद्दिष्ट म्हणजे देशाच्या वित्तीय व्यवस्थेवर सामान्य जनतेचं विश्वास राखणे आणि त्या किफायतशीर सेवा प्रदान करणे. देशातील सर्व विदेशी चलन विनिमय भारतीय रिझर्व्ह बँकद्वारे राखले जाते आणि त्याची काळजी घेतली जाते. हे असे केले जाते जेणेकरून परकीय व्यापार सुलभ आणि सुरळीत होऊ शकेल आणि परकीय बाजारपेठदेखील राखली जाईल. भारतीय रिझर्व्ह बँक ही संस्था आहे जी नोटा जारी करते. जुन्या नोटा नष्ट करते आणि लोकांमध्ये कोणते चलन चलनात आणण्यासाठी योग्य आहे हे ठरवते.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कार्या मध्ये व्यावसायिक बँकांना परवाने देणे, इतर बँकांची तपासणी करणे, ठेव विमा योजना राबविणे, बिगर–बँकिंग वित्तीय संस्थानांवर नियंत्रण ठेवणे. भारतीय रिझर्व्ह बँकचे एक क्रेडिट धोरण आहे. या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट किंमत स्थिरता नियंत्रण ठेवून विकास सुनिश्चित करणे आहे. विकासाला चालना देणे म्हणजे भारतात अधिक वस्तूंचे उत्पादन होते आणि देशात अधिक सेवा पुरवल्या जातात. त्यामुळे जीडीपी वाढण्यास मदत होते आणि भारताच्या अर्थव्यवस्थेवर एकूण सकारात्मक परिणाम होतो.

दुसरीकडे किंमत स्थिरता म्हणजे वस्तूंच्या किमतीत कोणताही बदल होणार नाही असा नाही तर त्याचा अर्थ फक्त महागाई नियंत्रित करावी असा आहे. औद्योगिक आणि कृषी विकासाला चालना देणे हेदेखील भारतीय रिझर्व्ह बँकेचे उद्दिष्ट आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेबद्दल आपण अधूनमधून ऐकत असतो ते म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँकचे पत धोरण व त्यावर अर्थतज्ञ आपले विचार मांडत असतात. नंतर आपल्याला भारतीय रिझर्व्ह बँकेबद्दल ऐकायला येत ते म्हणजे रेपो रेट कमी झाला किंवा वाढला. रेपो रेट कमी झाला म्हणजे सामान्य जनतेला विशेष करून गृह कर्जावर ईएमआय कमी होणार साधारणतः आपला हा सामान्यांचा संबंध येतो.


१ एप्रिलला भारतीय रिझर्व्ह बँकेला ९० वर्षे झाली. वर्धापन दिनानिमित्त एनसीपीए नरिमन पॉईंट येथे आयोजित कार्यक्रमास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची प्रमुख उपस्थिती लाभली. व्यासपीठावर राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, रिझर्व्ह बँकेचे गर्व्हनर संजय मल्होत्रा उपस्थित आदी होते. या वेळी मान्यवरांच्या हस्ते विशेष स्टॅम्पचे अनावरण करण्यात आले. आतापर्यंत आपल्या देशाचा कणा मजबूत आहे असे म्हणायला काही हरकत नाही. येत्या दिवसात ही बँक नक्कीच दणदणीत शतक झळकावेल, सर्व जगाच लक्ष वेधून घेईल व आपल्या देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल अशी अपेक्षा करूया! नवीन आर्थिक वर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!!

**–अरविंद मोरे, नवीन पनवेल**

# स्वातंत्र्यसेनानी सरोजिनी नायडू

'भारत कोकिला' नावाने प्रसिद्ध असलेल्या श्रीमती सरोजिनी नायडू यांचा जन्म १३ फेब्रुवारी १८७९ ला हैद्राबाद येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अघोरनाथ चट्टोपाध्याय होते. जे एक प्रसिद्ध वैज्ञानिक आणि शिक्षाशास्त्री होते. तसेच त्यांच्या आईचे नाव वरद सुंदरी होते. वरद सुंदरी या कवियित्री होत्या. त्या बंगाली भाषेत कविता लिहायच्या. सरोजनी नायडू यांनी वयाच्या १४ वर्षी सर्व इंग्रजी कवींच्या रचनांचे अध्ययन केले होते.

सरोजनी नायडू यांना १८९५ मध्ये हैद्राबादच्या निजाम ने त्यांना शिष्यवृत्तीवर इंग्लंडला पाठवले होते. सरोजनी नायडू या हुशार आणि प्रतिभावान विद्यार्थिनी होत्या. त्यांना इंग्लिश, बंगाली, उर्दू, तेलगु आणि फारसी भाषा अवगत होत्या. वयाच्या १९ वर्षी सरोजनी नायडू यांचा विवाह डॉ. गोविंद राजालु नायडू यांच्या सोबत सन १८९८



मध्ये झाला. त्यांनी घरीच इंग्रजी भाषेचे धडे घेतले. त्या वयाच्या १२ वर्षी मॅट्रीकची परीक्षा पास झाल्या. त्या शिक्षण पूर्ण करू शाकल्या नाही. पण इंग्रजी भाषेमध्ये काव्य सृजनमध्ये त्या प्रतिभावान होत्या.

गीतिकाव्य शैली मध्ये सरोजनी नायडू ने काव्य सृजन केले होते. १९०५, १९१२ आणि १९१७ मध्ये त्यांची कविता प्रसिद्ध झाली. १९०६ मध्ये कोलकत्ता गोखलेंच्या अधिवेशनमध्ये भाषणात त्यांनी महत्वपूर्ण भूमिका निभवली. त्यांनी महिलांना जागृत केले. कारण त्या वेळेला भारतीय समाजात कुप्रथा होत्या. भारताच्या स्वतंत्रतासाठी त्यांनी विविध आंदोलनात सहयोग दिला. खूप वेळेपर्यंत त्या कॉंग्रेसच्या प्रवक्ता होत्या. तसेच पुढे त्यांनी १९०८ मध्ये 'कैसर–ए–हिन्द' सन्मान परत करून दिला कारण त्यांना जलियांवाला बाग हत्याकांड वर राग आला होता. भारत छोडो आंदोलन मध्ये त्यांना आगा खां महल मध्ये शिक्षा दिली गेली. त्या उत्तरप्रदेशच्या पहिल्या महिला राज्यपाल बनल्या.



## बदलते तंत्रज्ञान

# घिब्ली स्टाइल फोटो तयार करा मोफत

सध्या सोशल मीडियावर घिब्ली Artफोटो ट्रेंडचा महापूरच आल्याचे दिसत आहे. घिब्लीने संपूर्ण जगाला वेड लावले आहे. घिब्ली Art फीचरने धुमाकूळ घातला आहे. सर्वच जण घिब्ली Art मध्ये आपला कार्टून फोटो क्रिएट करून सोशल मीडियावर शेअर करत आहे. एआय प्लॅटफॉर्म चॅट जीपीटीच्या माध्यमातून जवळपास प्रत्येक व्यक्ती फोटोवरून ॲनिमेशन बनवत आहे. लोक स्वतःचे, त्यांच्या पाळीव प्राण्यांचे आणि त्यांच्या सभोवतालच्या ठिकाणांचे फोटो घिब्ली प्रतिमांमध्ये रूपांतरित करत आहेत.




### घिब्ली स्टाइल म्हणजे काय?

स्टुडिओ घिब्ली हे एक इमेज जनरेशन टूल आहे. चॅट जीपीटीच्या या वैशिष्ट्याद्वारे, युजर्स त्यांचा कोणताही आवडता फोटो, चित्रपटातील फोटो किंवा कोणत्याही लोकप्रिय मीमला स्टुडिओ घिब्लीच्या फोटोमध्ये रूपांतरित करू शकतात. नुकतेच ओपन एआयने चॅट जीपीटी प्लस, प्रो आणि टीम वापरकर्त्यांसाठी इमेज जनरेशन फीचर लॉंच केलं आहे, ज्यामुळे इंटरनेटवर नवीन ट्रेंड सुरू झाला आहे, ज्यामध्ये तुम्ही तुमचे खरे फोटो जपानच्या प्रसिद्ध स्टुडिओ घिबलीच्या ॲनिमेटेड स्टाईलमध्ये करू शकता. घिब्ली कला म्हणजे स्टुडिओ घिब्लीच्या अनोख्या शैलीतील छायाचित्रे आहेत. ज्यामध्ये पेस्टल आणि म्यूट कलर पॅलेट आणि गुंतागुंतीच्या तपशीलांचा वापर केलेला असतो. ही दृश्य शैली तिच्या सर्जनशील खोलीमुळे आणि कथाकथनाच्या आकर्षणामुळे ॲनिमे चाहत्यांमध्ये लोकप्रिय झाली आहे. चॅट जीपीटीवापरून घिब्ली स्टाइल इमेज कशा तयार कराव्यात?

### हे करा

- तुमच्या फोनवर चॅट जीपीटीॲप उघडा. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही चॅट जीपीटी वेबसाइटदेखील वापरू शकता.
- ईमेल आयडी किंवा फोन नंबर वापरून ॲपमध्ये लॉग इन करा.
- यानंतर फोटो आणि त्याचे तपशिलवार वर्णन प्रविष्ट करा.
- इमेज जनरेट करण्यासाठी प्रॉम्प्ट सबमिट करा.
- काही सेकंदात एआय इमेज तयार होईल.
- तुम्ही चित्र सेव्ह किंवा शेअर करू शकता.

# अभिनेते डॉ. काशिनाथ घाणेकर

डॉ. काशिनाथ घाणेकर हे मराठी नाट्य व हिंदी–मराठी चित्रपट अभिनेते होते. अभिनय सुरू करण्याआधी घाणेकर व्यवसायाने दंतवैद्य होते. काशीनाथ घाणेकर यांचा जन्म १४ सप्टेंबर १९३२ रोजी चिपळूण येथे झाला आणि तिथेच त्यांनी शिक्षण पूर्ण केले.

सन १९६० ते १९८० या काळातले ते मराठीतले पहिले सुपरस्टार होते. स्त्रीरोगतज्ज्ञ इरावती कर्णिक या काशिनाथांच्या पहिल्या पत्नी होत. त्यांच्याशी घटस्फोट घेतल्यावर काशिनाथ घाणेकर यांनी अभिनेत्री सुलोचनाबाईंची कन्या कांचन लाटकर यांच्याशी लग्न केले. कांचन घाणेकरांनी स्वतः च्या वैवाहिक सहजीवनावर 'नाथ हा माझा' नावाचे पुस्तक लिहिले आहे.



## निमित्त

आपल्याच नजरेत आपले आदरयुक्त व्यक्तित्व उभारण्याच्या अट्टाहासापोटी आयुष्याच्या शेवटपर्यंत झगडणारे, वैद्यकीय व्यवसायाद्वारे समाजात इज्जत मिळवून सत्कारयुक्त जीवन जगण्याऐवजी रंगमंचावर आपले श्वास शोधणारे, मराठी रंगभूमीवरचा सुपरस्टार होऊनही वडिलांच्या कौतुकाच्या शब्दासाठी पात्र न ठरणारे आणि ते दु:ख आयुष्यभर कवटाळून रंगमंचावर अवतरल्यानंतर मिळणार्या टाळ्या आणि शिट्ट्यांच्या धुंदीत आपले आयुष्यच उधळून लावणारे, असे त्यांच्या व्यक्तित्वाचे धागे भल्याबुर्या व कुरुपतेच्या सर्व रंगांसह विणले गेले. डॉ. काशिनाथ घाणेकर यांनी आपल्या आयुष्याची क्षणभंगुरता आपल्या परीने याच निरर्थक हातवारे आणि तुर्रेबाजीने आपल्या परीने अर्थपूर्ण बनवली. त्यांचे अस्तित्व त्या रंगभूमीवर वावरण्याभोवती होते आणि त्यांचे प्राण समोरच्या गर्दीत होते.

सन १९६० ते १९८० या कालावधीत काशिनाथ हे मराठी नाट्य–चित्रसृष्टीचे पहिले सुपरस्टार होते आणि त्याकाळात ते सर्वात जास्त मानधन घेणारे अभिनेते होते. दादी माँ या १९६६ साली निघालेल्या हिंदी चित्रपटात काशिनाथ घाणेकर यांनी अशोक कुमार आणि बीना रॉय यांच्या मुलाची एक छोटी भूमिका केली होती. वसंत कानेटकर यांनी लिहिलेल्या 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकातल्या संभाजी महाराजांच्या भूमिकेनंतर घाणेकरांना अफाट लोकप्रियता लाभली. या नाटकाशिवाय त्यांनी इतर अनेक नाटकांमध्ये उत्तम अभिनय केला.

सन १९६८मध्ये निघालेल्या 'मधुचंद्र' या मराठी चित्रपटापासून काशीनाथ घाणेकर मराठी चित्रपटसृष्टीतील एक मोठे अभिनेते बनले. नाटक रंगमंचावर पहिली शिट्टी पडली ती काशिनाथ घाणेकर यांना. ज्यांच्या प्रवेशानेच टाळ्यांच्या कडकडाटात नाट्यगृहे दणाणून जात होती. त्यांच्या नावाने मराठी रसिकांना अक्षरश: वेड लावले होते. मराठी रंगभूमी आणि चित्रपट सृष्टीमध्ये डॉ. काशिनाथ घाणेकर यांचे अतुलनीय योगदान आहे. त्यांनी मराठी व्यावसायिक रंगभूमीला वैभवाचे दिवस आणले, अनेक तरुण अभिनेत्यांसाठी ते प्रेरणादायी ठरले. प्रभावशाली संवादफेक, जरब बसणारे डोळे आणि विशिष्ट पद्धतीने बोलण्याची त्यांची शैली अद्वितीय होती.

'रायगडाला जेव्हा जाग येते', 'इथे ओशाळला मृत्यू', 'अश्रूंची झाली फुले', 'गारंबीचा बापू', 'आनंदी गोपाळ', 'शितू', 'तुझे आहे तुजपाशी', 'सुंदर मी होणार', 'मधुमंजिरी' या आणि अशा अनेक नाटकांमधील त्यांच्या भूमिका जबरदस्त गाजल्या. 'एकटी', 'झेप', 'देवमाणूस', 'पाठलाग', 'मधुचंद्र', 'सुखाची सावली', 'मानला तर देव' या मराठी चित्रपटांमध्येही त्यांनी अभिनय केला. अशा या महान अभिनय सम्राटाचे २ मार्च १९८६ रोजी निधन झाले.


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# कोलेस्ट्रॉल वाढतंय... आवळ्याचे सेवन करा

आजकालच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे आणि चुकीच्या आहारामुळे वाईट कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते आहे. मानवाच्या शरीरात दोन पद्धतीचे कोलेस्ट्रॉल असतात. यामध्ये लो डेंसिटी लिपोप्रोटीन याला वाईट कोलेस्ट्रॉल मानलं जातं, तर दुसरीकडे हाई डेंसिटी लिपोप्रोटीन शरीरातील चांगलं कोलेस्ट्रॉल असतं. LDL नेहमी कमी असलं पाहिजे, असा सल्ला तज्ज्ञांकडून दिला जातो. LDL कोलेस्ट्रॉल शरीरासाठी हानिकारक आहे आणि यामुळे हृदयरोग, उच्च रक्तदाब आणि इतर गंभीर आरोग्य समस्या होऊ शकतात. पण, आवळा खाल्ल्याने 'खराब कोलेस्ट्रॉल' झपाट्याने कमी होऊ शकतो का, संशोधन काय सूचित करते, जाणून घेऊया



वेगवेगळ्या फळांमध्ये आवळा खूप फायदेशीर फळ मानलं जातं. आवळ्याचे आरोग्याला अनेक फायदे मिळतात. आवळ्यामध्ये वेगवेगळे व्हिटॅमिन्स भरपूर असतात. यात कॅल्शिअमही भरपूर असतं. आवळ्यामध्ये असलेलं व्हिटॅमिन सी अँटी–ऑक्सिडेंटसारखं काम करतं. याने फ्री रॅडिकल्स, अँटी–इन्फ्लेमेटरी आणि अँटी–मायक्रोबिअल तत्व वाढतात, ज्यामुळे इम्यून सिस्टीमचा प्रभाव वाढतो व तुमचा अनेक आजारांपासून बचाव होतो.

अभ्यासातून असे दिसून आले आहे की, आवळ्याचे नियमित सेवन केल्याने एलडीएल कोलेस्ट्रॉल लक्षणीयरीत्या कमी होते तर एचडीएल (हाय–डेन्सिटी लिपोप्रोटीन) कोलेस्ट्रॉल वाढते, ज्याला सामान्यतः चांगले कोलेस्ट्रॉल म्हणतात. एचडीएल रक्तप्रवाहातून एलडीएल फिल्टर करण्यास मदत करते, ज्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो. आवळ्याचे दाहकविरोधी गुणधर्म धमनीची जळजळ कमी करण्यास मदत करतात.

आवळ्याचे सेवन कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी किती प्रमाणात करावे?

ताजा आवळा : दररोज १–२ आवळ्याचे सेवन करावे. आवळ्याचा रस : २०–३० मिली (सुमारे २ चमचे) आवळ्याचा रस सकाळी रिकाम्या पोटी पिणं जास्त फायदेशीर ठरतं.

आवळा पावडर : आवळा पावडर १–२ चमचे (३–६ ग्रॅम) कोमट पाण्यात किंवा मधात मिसळून, दिवसातून एकदा किंवा दोनदा पिणं फायदेशीर ठरतं.अशाप्रकारे काही महिन्यांपर्यंत नियमित आवळ्याचे सेवन केल्याने कोलेस्ट्रॉल नियंत्रणात येऊ शकतो, असे संशोधकाचे म्हणणे आहे.

# माथेरानमध्ये व्यावसायिकांसाठी ड्रेसकोड, ओळखपत्र अत्यावश्यक

**नेरळ,: प्रतिनिधी**

माथेरान प्रवेश द्वाराजवळ माहिती केंद्र उभारण्याचे निश्चित केले असून व्यवसायाला शिस्त लावण्यासाठी येथील घोडे, कुली,रिक्षा व्यवसायकांना ड्रेस कोड,ओळख कार्ड देण्याचे ठरले आहे.त्याच बरोबर सुरुवातीला घोडे व्यवसाय,यानंतर १०० मीटरवर ई रिक्षा पर्यटकांसाठी उपलब्ध राहील म्हणून सांगण्यात आले आहे.

माथेरान घोडे व्यवसायकांचा प्रश्न पुन्हा एकदा आमदार थोरवे यांच्या पुढे चर्चेला गेला होता.माथेरान बंदचा निर्णय मागे घेण्यात आल्यानंतर काही ठरलेल्या नियमात बदल झाल्याने येथील घोडे व्यवसायकांवर २० दिवस झाले माथेरानच्या दस्तुरी नाक्यावर व्यवसायच मिळत नसल्याने कुटुंबावर उपासमारीची वेळ आली होती.हेच गाऱ्हाणे घेवून येथील घोडे व्यवसायकांनी आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेत आपण पर्यायी मार्ग काढावा म्हणून विनवणी केली होती.



अखेर आज १ एप्रिल रोजी सकाळच्या सत्रात आमदार थोरवे यांनी माथेरान प्रवेशद्वार असलेले दस्तूरी नाक्याची पाहणी केली.

त्याच बरोबर सुरुवातीला घोडे व्यवसाय,यानंतर १०० मीटरवर ई रिक्षा पर्यटकांसाठी उपलब्ध राहील म्हणून सांगण्यात आले आहे.पर्यटकाना दोन्ही पर्याय मंजूर नसतील तर त्यांच्यासाठी शटल सेवा देखील पर्याय म्हणून आहेच असे सांगण्यात आले.त्यामुळे पर्यटक जे ठरवतील त्यात बसतील म्हणून निर्णय घेण्यात आला.घोडे आणि इ रिक्षा ह्या समोरासमोर उभे असून यांच्यामधील सेवा देण्याचे भाडे तफावत असल्याने येथे घोडे व्यवसाय करणाऱ्या तरुणांना व्यवसाय मिळत नसल्यानेच अखेर आमदार थोरवे यांनी हा निर्णय घेण्याचे ठरले आहे.

दरम्यान घोडे व्यवसाय हा संवादातून होत असतो त्यामुळे पर्यटकांचा संवाद झाल्यास पर्यटक घोड्यावर बसण्यास तयार होतात.म्हणून पार्किंग मध्ये केवळ पाच जणांना यासाठी मुभा असेल म्हणून सांगण्यात आले आहे. कूली व्यवसाय करण्यासाठी देखील नियम लावण्यात आले.

# खोपोली नगर परिषद हद्दीतील मिळकतींचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण

## कोकणातील पहिला प्रयोग

**चौक : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषद हद्दीतील मिळकतींचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्याचा शुभारंभ आज करण्यात आला असून यामुळे आपली मालकी हक्क कायम होण्या बरोबर अतिक्रमण होणार नाही.

भारत सरकार ग्रामीण विकास मंत्रालय भूमि संसाधन विभाग यांचेमार्फत (N-KSH-) या पथदर्शी प्रकल्पाअंतर्गत खोपोली नगरपरिषदेची कोकण विभागात निवड झाली आहे. खोपोली नगरपरिषद क्षेत्रामधील सर्व मिळकतींचे सर्व्हे ऑफ इंडिया आणि नागरी स्वराज्य संस्था यांच्या सहाय्याने भूसंदर्भीकरण (Geo-Referancing) व नगर भूमापन अभिलेख अद्यावतीकरण करण्यात येणार आहे. सदरचे नक्शा प्रकल्पाअंतर्गत नगर परिषद क्षेत्रामधील सर्व मिळकत



धारकांना जी.आय.एस. आधारित मिळकतींचे नकाशे व अद्यावत मिळकत पत्रिका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यानुसार सदरचे कार्यक्रमाचे प्रथम टप्प्याअंतर्गत सर्व्हे ऑफ इंडिया मार्फत संदर्भ नियंत्रण खुणा (जी.सी.पी.) निश्चित करण्यात आलेल्या असून दि.०१/०४/२०२५ रोजी ड्रोन सर्वेक्षण कामाचा शुभारंभ करण्यात आलेला आहे.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन उपसंचालक भूमी अभिलेख कोकण प्रदेश अनिल माने यांच्या हस्ते, जिल्हा भूमी अधिक्षक सुनील इंदलकर, डॉ. पंकज पाटील मुख्याधिकारी नगर परिषद खोपोली,प्रमोद जरग, उप अधीक्षक भूमी अभिलेख खालापूर,समाधान पाटील शिरस्तेदार, उत्तम केंद्रे, मुख्यालय सहाय्यक, उप अधीक्षक भूमी अभिलेख, खालापूर हे उपस्थित होते.

# अश्विनी महाडिक यांची नियुक्ती



**माणगाव : प्रतिनिधी**

राष्ट्रीय गौरक्षक सेना प्रदेश अध्यक्ष महिला इकाई महाराष्ट्रपदी माणगाव येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्या अश्विनी महाडिक यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना तशा आशयाचे नियुक्तीपत्र राष्ट्रीय गौरक्षक सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शैलेंद्र पहलवान चौधरी यांच्या सहीनिशी देण्यात आले आहे. अश्विनी महाडिक यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

आपल्या या नियुक्तीबद्दल प्रसारमाध्यमां जवळ बोलताना अश्विनी महाडिक यांनी माझ्यासारख्या ग्रामीण भागातील एका छोट्याशा महिला कार्यकर्त्यावर विश्वास दाखवून मला प्रदेशात काम करण्याची संधी राष्ट्रीय अध्यक्षांनी दिली आहे. या संधीचे सोने करून राष्ट्रीय अध्यक्षांचा विश्वास सार्थ ठरवीन. राष्ट्रीय गौरक्षक सेनेचे काम करताना महिलांना संघटित करून वेगवेगळे सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबवून महिला सक्षमीकरणावर आपला जास्तीत जास्त भर असेल, असे म्हटले आहे.

# श्री स्वामी समर्थ प्रकटदिनी विविध कार्यक्रम उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ मठ पळसदरी येथे श्री स्वामी समर्थ प्रकटदिन अर्थात आनंदोत्सव हर्षोल्हासात साजरा झाला. यावेळी हजारो भाविकांनी श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.

प्रतिवर्षाप्रमाणे गुढीपाडव्याला विणावर श्री स्वामी समर्थ या षडा:क्षरी मंत्राच्या जपाने या कार्यक्रमाला सुरूवात झाली तसेच श्री स्वामी समर्थ प्रकटदिनी पहाटे ब्रम्ह मुहूर्तावर श्री स्वामी समर्थांचा सामुदायिक जप त्यानंतर काकडआरती, सकाळी महाअभिषेक, दत्तयाग, दुपारी महाआरती, महाप्रसाद तसेच दुपारी 'सौ.सुधा संजय लेले भावे प्रस्तुत 'स्वरसुधा' हा केतकी भावे जोशी, ऐश्वर्या भावे जोगळेकर, श्रद्धा भावे फडके



यांचा भावभक्तीगीतांचा कार्यक्रम संपन्न झाला त्यांना तबल्यावर अतुल गोडसे, पखवाज मधुकरबुवा धोंगडे, संवादिनीवर ऋतुजा कर्वे कुंटे, सिन्थेसाईजरवर विलास बोंबले, ढोलकीवर यश हजारे आणि साईड –हीदमवर शरद हजारे यांनी साथसंगत केली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आकाशवाणी मुंबईचे निवेदक दिनेश अडावदकर यांनी केले.

या कार्यक्रमादरम्यान मुळच्या कर्जतच्या रहिवासी कवी, लेखीका नाटककार,गीतकार, संगीतकार सुधाताई संजय लेले भावे यांचा शाल, श्रीफळ, सन्मानपत्र, तसेच वयाची पंच्च्याहत्तरी म्हणजेच अमृत महोत्सव पूर्ण करून शतक महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या सुधाताईबरोबरच पळसदरीमधील शतक महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या अकरा ज्येष्ठ ग्रामस्थांना शाल, श्रीफळ,आणि 'जाणीव'नावाने सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यामध्ये यशवंत निगुडकर, पंढरीनाथ निगुडकर, वसंत पालांडे, अनंत दरेकर, महादेव दरेकर, शशिकांत दरेकर, रामचंद्र दरेकर, बळीराम महाडिक, बबन पवार, अरविंद दरेकर यांचा समावेश होता. संध्याकाळी श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थांच्या गजरात,भजन,ब्रम्हा ढोलताशांच्या गजरात उंट, घोड्यांसह फटाक्यांच्या आतशबाजीत स्वामींच्या रथयात्रेचे आयोजन करण्यात आले होते या रथयात्रेत तसेच स्वामीदर्शनासाठी कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे आवर्जून उपस्थित होते.

श्वेता देशमुख संचालीत नादब्रम्ह भजन मंडळाचा कार्यक्रम अनिता मेढी, रूचिरा निगुडकर, कामिनी चव्हाण यांनी सादर केला त्यांना तबल्यावर व्यंकटेश हरणे आणि हार्मोनियमवर रघुनाथ बुवा बडेकर यांनी साथसंगत केली मध्यरात्री बारा वाजता पहाटेपासून सुरू झालेल्या कार्यक्रमाची सांगता झाली.

# सावरोलीत लोकवर्गणी, ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून शिवसृष्टी

## खासदार सुनील तटकरेंच्या हस्ते लोकार्पण

**खोपोली : प्रतिनिधी**

सावरोली गावातील तरुणांनी पुढाकारातून साकारण्यात आलेल्या भव्य छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा व शिवश्रृष्टीचा लोकार्पण सोहळा गुडीपाडव्याचे शुभमुहर्तावर रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.या सोहळ्यासाठी वंशज सिद्धार्थ कंक,सत्यशील राजे दाभाडे,डॉ श्रमिक गोजमुगुडे,धनंजयभाई देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती.



खालापूर तालुक्यामधील सावरोली गावातील तरुणांनी एकत्रित येत गावाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर भव्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा, शिवश्रृष्टी उभारण्यासाठीचा संकल्प केला.यासाठी मोठ्या निधीची गरज असल्याने ग्रामस्थांनी लोकवर्गणी जमा केली त्यामध्ये ग्रामपंचायतीने निधी उपलब्ध करीत भव्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे व शिवषष्टी साकारण्यात आली आहे.

या दोन दिवसीय कार्यक्रमात शनिवारी सायंकाळी पुणे येथील व्याख्याते यशवंत गोसावी यांचे शिवराया आधारित व्यखान सादर झाले त्यांनतर पनवेल येथील शुभम पाटील यांचा पोवाड्याचा कार्यक्रम ,रविवारी गावातील महिलांनी पहाटे स्मारका जवळ किशोर महाराज बैलमारे,किरण महाराज घोसाळकर, नरेश महाराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काकड आरती सादर केली त्यांनतर गावातील तरुण जोडप्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन व अभिषेक केला

शिवरायांचे वंशज सिद्धार्थ कंक, सत्यशील राजे दाभाडे,डॉ श्रमिक गोजमुगुडे,धनंजय भाई देसाई यांच्या हस्ते खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण केले. खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते महाआरती घेण्यात आली.

या कार्यक्रमाला आमदार महेंद्र थोरवे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर घारे,अंकित साखरे, पोलीस निरीक्षक सचिन पवार ,माजी जिल्हा परिषद सदस्य गोविंद बैलमारे,सावरोलीचे सरपंच संतोष बैलमारे, उपरपंच मनाली दर्गे ग्रामसेवक योगेश पाटील,सदस्य समाधान बैलमारे,शुभम किलंजे ,सागर घोसाळकर, दत्तात्रेय तांबडे,रंजना नंदकुमार पाटील,आराधना नागेश मेहत्तर ,उज्वला घोसाळकर, ममता घोसाळकर चित्रा घोसाळकर, रुणाली योगेश बारड शेखर वालेकर, रायगड जिल्हा प्रेस क्लब चे अध्यक्ष प्रशांत गोपाळे सामाजिक कार्यकर्ते यासह मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ महिला तरुण वर्ग उपस्थित होते.

**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री. अखिल संजय म्हात्रे, ए५+३०+३१+३२, सेक्टर ०६, न्यू पनवेल (पूर्व) ता. पनवेल, जि. रायगड | ०२ नारळ, ०१ फणस, ०१ पारिजातक व ०१ कडूनिंब अशी एकूण ०५ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील ए ५+३० +३१+३२, सेक्टर–०६,न्यू पनवेल (पूर्व), ता. पनवेल, जि. रायगड येथे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| २ | अध्यक्ष/सचिव, महावीर शिखर सहकारी गृह. संस्था मर्या., प्लॉट नं.४५, आदर्श सोसायटी, ५२ बंगलो क्षेत्र, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड | ०५ नारळ झाडे, व १ गुलमोहर अशी एकूण ०६ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील महावीर शिखर सहकारी गृह, संस्था मर्या.,प्लॉट नं. ४५, आदर्श सोसायटी, ५२ बंगलो क्षेत्र, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड या सोसायटी आवारात असलेली ०५ नारळ झाडे व ०१ गुलमोहर अशी एकूण ०६ झाडे वाहन पार्किंग साठी अडथळा ठरत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.१३९/१३९/२०२५
दिनांक : ०१/०४/२०२५

**सही/–**
**(स्वरुप खारगे)**
उपायुक्त (वृक्ष प्राधिकरण विभाग)
पनवेल महानगरपालिका

# नेरळ येथील स्वामी समर्थ क्रीडांगणाचे लोकार्पण

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ गावातील मातोश्री नगर भागात असलेल्या श्री स्वामी समर्थ मंडळाच्या पुढाकाराने स्वामी समर्थ प्रकट दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात स्वामी समर्थ क्रीडांगणाचे लोकार्पण आमदार महेंद्र थोरवे यांचे हस्ते करण्यात आले.

नेरळ गावातील मातोश्रीनगर मध्ये श्री स्वामी समर्थ प्रकट दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी स्वामींच्या पादुका आणि प्रतिमा पूजन करण्यात आले.त्यानंतर दुपारी बारा वाजता स्वामींची आरती आणि नामजप सुरू झाले. दुपारी चार वाजता वाकस येथील श्री गजानन प्रासादिक भजन मंडळाने भजनाचे कार्यक्रम सादर केले. त्यात अनंतबुवा तलपे, भरतबुवा गाडे यांना मृदुंगमनीवर सुरेश कदम यांनी साथ दिली. सायंकाळी सहा वाजता कर्जत येथील श्रीपतीबाबा महिला भजन मंडळाचे सुचिता वांजळे यांनी अभंगवाणी आणि भजन सादर केली.

सायंकाळी सात वाजता स्वामी स्तवन आणि महाआरती आमदार महेंद्र थोरवे यांचे हस्ते करण्यात आली. त्यावेळी मंडळाचे कार्यकर्ते आणि शिवसेना पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते. आरती नंतर आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या निधी मधून विकसित करण्यात आलेल्या क्रीडांगण आणि स्वामी समर्थ व्यासपीठ यांचे लोकार्पण आमदार थोरवे यांचे हस्ते करण्यात आले.या स्वामी समर्थ प्रकट दिनाच्या कार्यक्रमासाठी उद्योजक निकेश म्हसे यांनी भंडारा महाप्रसाद यांचे आयोजन केले होते.




**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव अहिल्यादेवी सांगोला नागरी सहकारी पतसंस्था मर्या. कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड., असे असून सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. ०३/०४/२०२५ ते ०९/०४/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दि. ११/०४/२०२५, नामनिर्देशन पत्र माघारी दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक १८/०५/२०२५ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयामध्ये पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

दिनांक : १/०४/२०२५

**सही/–**
**(सुरेखा पाटील)**
निवडणूक निर्णय अधिकारी

**ग्रामपंचायत पांगळोली**
मू पो, पांगळोली ता. म्हसळा, जि. रायगड

**जाहीर निविदा**

| अ.क्र. | कामाचे नाव | वर्ष | रक्कम | अनुदान प्रकार | १% इसारा | निविदा फी | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बौद्धवाडी विहीर दुरुस्ती | २०२१–२२ | २४०००/– | १५ वित्त आ | २४०/– | १००/– | ३ महिने |
| २ | शामिल मोहल्ला आणि मोमीन मोहल्ला पाईपलाईन | २०२२–२३ | १५००००/– | १५ वित्त आ | १५००/– | १००/– | ३ महिने |
| ३ | मोमीन मोहल्ला पाण्याची टाकी दुरुस्ती करणे | २०२४–२५ | १३२३९०/– | १५ वित्त आ | १३२४/– | १००/– | ३ महिने |
| ४ | मोमीन व मजिद मोहल्ला पाईपलाईन | २०२१–२२ | ६७०००/– | १५ वित्त आ | ६७०/– | १००/– | ३ महिने |
| ५ | शामिल मोहल्ला विहीर दुरुस्ती | २०२१–२२ | २४०००/– | १५ वित्त आ | २४०/– | १००/– | ३ महिने |
| ६ | पांगळोली पठाणवाडी विहीर दुरुस्ती | २०२४–२५ | १२००००/– | १५ वित्त आ | २४०/– | १००/– | ३ महिने |
| ७ | कुणबीवाडी येथे पाण्याची टाकी बसविणे | २०२०–२१ | ५००००/– | १५ वित्त आ | १२००/– | १००/– | ३ महिने |
| ८ | कुणबीवाडी येथे पाणी पुरवठा सुधारणा करणे | २०२२–२३ | २०६७३/– | १५ वित्त आ | २०६/– | १००/– | ३ महिने |
| ९ | बौद्धवाडी विहीर परिसर व सुशोभिकरण | २०२०–२१ | ३१७३९/– | १५ वित्त आ | ३१७/– | १००/– | ३ महिने |
| १० | रा.जि.प. शाळा मुलींच्या स्वच्छतागृहाची दुरुस्ती | २०२१–२२ | २००००/– | १५ वित्त आ | २००/– | १००/– | ३ महिने |
| ११ | शामीन मोहल्ला गटार बांधणे | २०२२–२३ | ७००००/– | १५ वित्त आ | ७००/– | १००/– | ३ महिने |

**अटी व शर्ती**

१. सिलबंद निविदा दिनांक ०२/०४/२०२५ ते दि ०७/०४/२०२५ या कालावधी पर्यंत सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत सादर करावी.
२. प्राप्त निविदा मासिक सभेत उघडण्यात येतील.
३. निविदा सादर करताना ठेकेदाराने प्रत्येक कामाची १% इसारा रक्कम भरणा केल्याशिवाय निविदा स्विकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.
४. मुदतीत न आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.
५. कोणतीही एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा पुन्हा निविदा मागविण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला राहील.
६. काम पूर्ण झाल्यावर एक वर्ष विनामुल्य देखभाल करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

दिनांक : १/०४/२०२५

**सही/–**
**ग्रामसेवक**
ग्रामपंचायत पांगळोली
ता. म्हसळा, जि.रायगड.

**सही/–**
**सरपंच**
ग्रामपंचायत पांगळोली
ता. म्हसळा, जि.रायगड.

# आजपासून नवी मुंबईत 'जागर'

## ऐरोलीतील ज्ञानस्मारकात कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली, सेक्टर १५ येथे नवी मुंबई महापालिकेने उभारलेले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यतम स्मारक तेथील वैशिष्ट्यपूर्ण सुविधांमुळे देशातील अत्युत्तम स्मारक असल्याचे अभिप्राय त्याठिकाणी भेटी देणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींप्रमाणेच सामान्य नागरिकांकडूनही व्यक्त करण्यात आलेले आहेत.

स्मारकातील बाबासाहेबांचा जीवनप्रवास दाखविणाऱ्या अनेक दुर्मीळ छायाचित्रांचा संग्रह असणारे संग्रहालय, आभासी चित्रप्रणालीद्वारे बाबासाहेबांचे भाषण ऐकण्याचा सुवर्णयोग देणारा विशेष कक्ष, ध्यानकेंद्र अशा विविध नाविन्यपूर्ण सुविधांप्रमाणेच येथील आधुनिक 'ई लायब्ररी'सह असलेले समृध्द ग्रंथालय हा या स्मारकाचा आत्मा आहे, असेही मत स्मारकाला भेटी देण्याऱ्या अभ्यासकांकडून मांडले जाते.

'ज्ञान हीच शक्ती' या बाबासाहेबांच्या प्रेरणादायी विचारांचा प्रसार या स्मारकातून व्हावा यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेने याठिकाणी सुरूवातीपासूनच विविध मान्यवर



व्यक्तींच्या व्याखानांचे आयोजन करीत ज्ञानजागर करण्याचा वसा जोपासला आहे.

या अनुषंगाने मागील नियमितपणे 'विचारवेध' या शिर्षकांतर्गत साहित्य, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन याठिकाणी करण्यात येत आहे. त्यासोबतीनेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाचे औचित्य साधून 'जागर' ह्या मान्यवर व्यक्तींच्या विविध विषयांवरील व्याख्यानांच्या विशेष कार्यक्रमांचे आयोजन जयंतीपूर्वीच्या पंधरवड्यात करण्यात येते. या सर्व उपक्रमांना श्रोत्यांचा अतिशय उत्तम प्रतिसाद लाभत आहे. एवढेच नव्हे तर यापुढे कोणाचे व्याख्यान अशी विचारणाही जाणकार वाचक, रसिकांकडून करण्यात येते.

'जागर' व्याख्यानमालेची ही वैचारिक परंपरा कायम राखत यावर्षी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून 'जागर २०२५' या व्याख्यान शृंखलेचे सायं. ६.३० वा. आयोजन करण्यात आलेले आहे.

या जागरमध्ये बुधवार, २ एप्रिल रोजी सुप्रसिध्द व्याख्याते डॉ. हरीश वानखेडे यांचे 'सामाजिक न्याय आणि समानता' या विषयावर व्याख्यान होणार आहे.

शुक्रवार, ४ एप्रिल रोजी नामवंत साहित्यिक - व्याख्याते प्रा.प्रवीण दवणे हे 'युवकांचे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर हृदयसंवाद साधणार आहेत.

रविवार, ६ एप्रिल रोजी लोकप्रिय कवी - व्याख्याते श्री.अरूण म्हात्रे हे 'प्रिय भिमास...' या अभिनव कार्यक्रमातून कविता आणि गीतांचे सादरीकरण करणार असून त्यांच्यासमवेत गंधार जाधव आणि गाथा जाधव-आयगोळे हे कलावंत काव्यजागरात सहभागी होणार आहेत.

मंगळवार, ८ एप्रिल रोजी नामांकित व्याख्याते प्रा. हर्षद भोसले यांचे 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षणाविषयीचा दूरदृष्टीकोन' या विषयावर व्याख्यान आहे. गुरूवार, १० एप्रिल रोजी फँड्री, सैराट, लापता लेडी अशा विविध चित्रपटांतून आपल्या अभिनयाचा ठसा उमटविणाऱ्या नामांकित अभिनेत्री छाया कदम यांची अनुभवसमृध्द जीवनप्रवास उलगडविणारी मुलाखत होणार आहे.

शुक्रवार, ११ एप्रिल रोजी नामवंत व्याख्याते प्रा.मृदुल निळे यांचे 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजातील समाजातील उपेक्षितता, मुक्ती आणि जाणीव याबाबतचे विचार' या विषयावर व्याख्यान असणार आहे. रविवार, १३ एप्रिल रोजी विविध क्षेत्रात आपले कर्तृत्व गाजविणारे तरूण पिढीचे काही शिलेदार हे 'भिमा तुझ्या जन्मामुळे' या शिर्षकांतर्गत उपस्थितांशी सुसंवाद साधणार आहेत.

### व्याख्यानांची वैचारिक पर्वणी

विविध व्याख्यानपुष्पे गुंफत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनाचे औचित्य साधून त्यापूर्वी पंधरवडाभर वैचारिक आदरांजली अर्पण केली जाणार असून या वेळी ज्ञानाचा जागर करण्यासाठी नागरिकांनी व त्यातही विशेषत्वाने युवकांनी कार्यक्रमांच्या दिवशी सायं. ६.३० वा. एक ते दीड तास चालणाऱ्या व्याख्यानांचा वैचारिक आस्वाद घेण्यासाठी नवी मुंबई महापालिकेचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, ऐरोली-मुलुंड खाडी पुलाजवळ, सेक्टर १५, ऐरोली, नवी मुंबई येथे मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# बस प्रवासात आठ लाखांच्या दागिन्यांची चोरी; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

म्हैसूर येथून खाजगी ट्रॅव्हल्स बसने मुंबईत येत असलेल्या वृध्द दाम्पत्याचे तब्बल ८ लाख रुपये किंमतीचे दागिने असलेली हँडबग चोरल्याची घटना उघडकीस आली आहे. कामोठे पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

ठाणे येथे राहणाऱ्या नागरत्न पटेल (वय ६४) या पतीसह म्हैसूर येथून कृष्णा ट्रॅव्हल्सच्या बसमधून मुंबईत परतत होत्या. यावेळी त्यांच्यासोबत दोन सुटकेस, तीन गोण्या आणि चार छोट्या बॅगा होत्या. तसेच त्यांच्याजवळ असलेल्या हॅन्डबॅगेमध्ये त्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे सुमारे आठ लाख रुपये किंमतीचे दागिने, मोबाईल फोन आणि चष्मे ठेवले होते. ही हँडबॅग त्यांनी आपल्या सोबत ठेवली होती. बस २४ मार्च रोजी सकाळी ५.३० वाजता पुण्यातील वाकड येथील बस स्टॉपवर थांबली असता, नागरत्न आणि त्यांचे पती शौचालयात जाण्यासाठी बसमधून खाली उतरले होते. त्यावेळी नागरत्न यांच्यासोबत त्यांची हँडबॅग होती. शौचालयावरुन आल्यानंतर नागरत्न हँडबॅग आपल्या सोबत ठेवून बसमध्ये सीटवर झोपी गेल्या.

यादरम्यान बसमध्ये असलेल्या चोरट्याने संधी साधून नागरत्न यांची किंमती ऐवज असलेली हँडबॅग चोरली. सकाळी ७.३० वाजता बस कळंबोली येथे



आल्यानंतर नागरत्न यांना जाग आली. यावेळी त्यांची हँडबॅग चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी बस चालकाला त्याबाबत माहिती दिली असता, त्याने बसमधील सर्व प्रवाशांसह बस कुर्ला येथील कार्यालयात नेली. तेथे बसमधील सर्व प्रवाशांची झडती घेण्यात आली. तसेच त्यांच्याकडील बॅगांचीदेखील तपासणी करण्यात आली, मात्र त्यात नागरत्न यांचे दागिने अथवा त्यांची हँडबॅग सापडली नाही. त्यामुळे त्यांनी कामोठे पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली.

दरम्यान, बसमधील चोरट्याने नागरत्ना यांची किंमती ऐवज असलेली हँडबॅग चोरल्यानंतर त्यातील आठ लाखांचे दागिने काढून घेतल्यानंतर मोबाईल फोन आणि चष्म्यासह त्यांची बॅग लोणावळा हायवेवर फेकून दिली. सदरची हँडबॅग एका नागरिकाला सापडल्यानंतर त्याने नागरत्न यांना संपर्क साधून त्यांची बॅग त्यांना परत दिली, मात्र त्यातील दागिने चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

## तुर्भे बस आगारात शिरलेल्या नागाची सुटका

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी मुंबई महापालिका परिवहन सेवेच्या तुर्भे बस आगारात रविवारी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास घुसलेल्या एका नागाची सर्पमित्र विशाल तुपे (बाज्या) याने सुटका केली. त्यानंतर या सापाची पामबीच येथील जंगलामध्ये त्याची सुखरुप सोड्डुन देण्यात आले.

नाग आगारातील पेटाऱ्याखाली लपून बसल्याचे बस आगारातील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तत्काळ सर्पमित्र विशाल तुपे (बाज्या) याला माहिती दिली.

विशाल तुपे यांनी घटनास्थळी धाव घेत शिताफीने नागाला पकडून त्याला वाशी येथील पामबीच मार्गालगतच्या जंगलात सुरक्षितरित्या सोडून दिले. यापूर्वीही नागरी वस्ती, शासकीय कार्यालये आणि वर्दळीच्या ठिकाणी आढळलेल्या अनेक सापांना विशाल तुपे यांनी सुखरुप जंगलात मुक्त केले आहे.

## शिवजयंतीनिमित्तच्या स्पर्धेचा निकाल जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी सांस्कृतिक सेल पनवेलतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'स्पर्धा गोष्टींची' या ऑनलाईन स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे.

या स्पर्धेत छत्रपती शिवाजी महाराज यांचे आयुष्य, कर्तृत्व, नेतृत्व, दातृत्व, त्यांचे बालपण किंवा महाराजांच्या आयुष्यातील प्रसंग यापैकी एक विषय स्पर्धकांना देण्यात आला होता. त्यानुसार या स्पर्धेतील खुल्या गटात अविनाश बिरारी यांनी प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक सविता पाटील, तृतीय क्रमांक शार्दूल बुवा तर स्नेहल जगे यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक पटकाविले. शालेय गटात विधी केणे प्रथम क्रमांक, संस्कार पाटील द्वितीय क्रमांक, तृतीय क्रमांक मधुश्री शिंदे आणि रश्मी म्हात्रे हिने उत्तेजनार्थ क्रमांक मिळविला. प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तजेनार्थ क्रमांकास अनुक्रमे तीन हजार रुपये, दोन हजार रुपये, एक हजार रुपये आणि ५०० रुपये आणि प्रमाणपत्र देऊन लवकरच एका कार्यक्रमाचे आयोजन करून मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

## शिबिरात ९४ जणांचे रक्तदान

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील लायन क्लब ऑफ ऐरोली तसेच नवी मुंबई महापालिका ह्यांच्या सहयोगाने शहापूर मधील एआरएमआयईटी इंजिरिनिंग कॉलेजमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. एल एस बोथरा ह्यांच्या वाढदिवसाच्या निमित्त सलग १० व्या वर्षी रक्तदान शिबिर आयोजित केले होते. यावेळी नवी मुंबई पालिकेच्या आरोग्य विभागाचे सहकार्य लाभले.

या शिबिरास कॉलेज विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कॉलेजमधील ९४ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. या वेळी ऐरोली लायन क्लबच्या अध्यक्षा प्रीती शेट्टी,



लायन क्लबचे व्हॉईस डिस्ट्रिक्ट गवर्नर संजीव सूर्यवंशी, सेक्रेटरी संजय आवारे, किर्ती सूर्यवंशी तसेच कॉलेजचे प्राध्यापक डॉ. प्रकाश पाटील व नवी मुंबई महानगर पालिकेचे डॉक्टर तसेच इतर सहायक कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

## मोहोपाडा येथे नववर्ष स्वागतयात्रा उत्साहात



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

हिंदू नववर्ष म्हणजे चैत्र शुध्द प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्यानिमित्त अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांच्या जिल्हा सेवा समिती - उत्तर रायगड च्यावतीने मोहोपाडा रसायनीत ढोल ताशांच्या गजरात भव्य दिव्य नववर्ष स्वागत यात्रा काढण्यात आली.

सांस्कृतिक दर्शन तसेच अध्यात्मिक, सामाजिक संदेश यांचा मिलाफ या मिरवणुकीत पहायला मिळाल्याने या शोभायात्रेने मोहोपाडा खालापूर वासियांचे लक्ष वेधून घेतले. या स्वागतयात्रेत सामाजिक जाणिवांची जागृती होणारे, परंपरा आणि ऐतिहासिक चित्ररथ पनवेल, अलिबाग, उरण, पेण, खालापूर, सुधागड, कर्जत आणि रोहा आदी तालुक्यातून सहभागी झाले होते.

हिंदु संस्कृतीचे जतन व्हावे, सर्व लोकांनी एकत्र यावे, विविधतेतील एकतेचे दर्शन व्हावे, संत परंपरेचा वारसा जपला जावा, नवीन पिढीवर संस्कार व्हावेत यासाठी दरवर्षी गुढीपाडव्यानिमित्त रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांच्या जिल्हा सेवा समिती उत्तर रायगडच्या वतीने भव्य स्वागत यात्रेचे आयोजन करण्यात येते.

या शोभायात्रेची सुरुवात श्री च्या धुपारतीने हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत अचानक मैदान मोहोपाडा येथून प्रस्थान होऊन आळी आंबिवली,मोहोपाडा गाव, मोहोपाडा बाजारपेठ, नवीन पोसरी ते जनता विद्यालय मोहोपाडा या मार्गाने संपन्न झाली. मिरवणुक मोहोपाडा गावात येताच ग्रामपंचायत सदस्या रसिका राकेश खराडे यांनी आरती ओवाळणी करून मनोभावे पुजन केले.

स्वागत यात्रे मोहोपाडा जनता विद्यालय मैदानावर पोहचताच सरपंच उमाताई संदिप मुंढे, सरपंच विनोद खवले, माजी सभापती नरेश पाटील, माजी सभापती रमेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य केदार भोईर, सदस्य आकाश जुईकर, सुभाष आहीर, मनिष गायकवाड, संतोष पांगत, रमेश पाटील, हभप काशिनाथ महाराज, चेतन जाधव, जनार्दन मालुसरे, मंगेश पाटील, प्रदीप पाटील व्यापारी संघटना अध्यक्ष मोहोपाडा, सचिन मालकर व्यापारी संघटना सचिव मोहोपाडा, निलेश जुनगरे, योगेश खाने,शिवराम कावडे, मनोज सोमाणी, चंद्रकांत खेडेकर-ग्रामपंचायत सदस्य, माजी जिल्हा परिषद सदस्यशशिकांत देशमुख, अमित शहा आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जेंडर सेन्स्टायजेशन प्रशिक्षण आणि सुधारक सन्मान पुरस्कार



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महिला आर्थिक विकास महामंडळ रायगड अंतर्गत प्रगती लोकसंचलीत साधन केंद्रद्वारा माविम मित्र मंडळकरीता जेंडर सेन्स्टायजेशन प्रशिक्षण व सुधारक सन्मान पुरस्कार कार्यक्रम झाला. मान्यवरांचे स्वागत संचालक मंडळ तसेच CMRC स्टाफकडून करण्यात आले.

ट्रेनिंग चे साधन व्यक्ती शेखर चोरगे यांनी पुरुषांना अनेक मुद्यावर प्रशिक्षण दिले. भेदभाव, रंगावरून, पेहरावरून, कामावरून, अशा अनेक विषयांवर प्रशिक्षण दिले. तसेच शेतीविषयक भरत राणे व विनायक देशमुख यांनी माहिती दिली. त्याचबरोबर चर्चा सत्र घेण्यात आले, सर्वांना हे प्रशिक्षण खूप आवडले तसा त्यांनी अभिप्राय ही दिला. प्रगती CMRC असे कार्यक्रम घेऊन मोलाचे योगदान देते असेही अभिप्राय मध्ये सांगण्यात आले. शिवाय आम्ही कधीही मदतीला उभे राहू, असे मनोगत देताना पुरुषांनी मांडले.

तसेच प्रशिक्षण झाल्यावर ज्या पुरुषांनी सन २०२४-२५ या वर्षात उत्कृष्ट कामगिरी केली अशा पुरुषांना सुधारक सन्मान पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. या कार्यक्रमास प्रगती लोकसंचलीत साधन केंद्राचे अध्यक्ष डॉ. हेमलता चिंबुळकर, सदस्य अमिता गायकवाड, जयश्री पिंजन,रीजवाना प्रधान, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भरत राणे, विनायक देशमुख तसेच जेंडर प्रशिक्षक शेखर चोरगे तसेच पत्रकार माळी आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रगती CMRC च्या व्यवस्थापक पदमावती गायकवाड मॅडम यांनी केले. कार्यक्रम अगदी यशस्वीरित्या करण्यास प्रगती सीएम आरसीच्या सर्व कर्मचारी वर्गाचे-अश्विनी भवारे, सुमन भोईर, मंगल ठोंबरे, मधुरा शेळके, अंकिता बडेकर, अनुष्का मालकर, तसेच भरत राणे शिवाय संचालक मंडळ यांनी मोलाचे सहकार्य केले.

## नेरूळमध्ये नववर्ष शोभायात्रा



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सर्वत्र गुढीपाडवा, नववर्षाचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. नवी मुंबईतील नेरूळ येथे श्रीगणेश सोसायटीमध्येदेखील यंदा नव वर्षानिमित्त पहिल्यांदाच शोभायात्रा आणि गुढीपाडवा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

पारंपरिक पोशाख, वाद्यवृंद, छत्रपती शिवराय, आई जिजाऊ, संत तुकाराम, संत ज्ञानेश्र्वर, वासुदेव यांसह विविध वेशभूषा पात्रे या शोभायात्रेत सहभागी झाले होते. सामाजिक संदेश देत, मराठी अस्मिता जपत संस्थेतील लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी मोठ्या आनंदाने शोभायात्रेत सहभाग घेत नवीन वर्षाच्या शुभेच्छांची देवाणघेवाण केली.

आपली संस्कृती जपली पाहिजे, नव्या पिढीला यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे या उद्देशाने या शोभायात्रेचे प्रथमच आयोजन केल्याचे संस्थेतील सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## बेलापूर येथे स्वामी समर्थ प्रकट दिन


**नवी मुंबई : बातमीदार**

सीबीडी-बेलापूर से-८ येथील श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक-बालसंस्कार केंद्र येथे ३१ मार्च रोजी श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष हेमंत आढाव, त्यांचे सहकारी श्रावण व्हावले, अ‍ॅड. अरुण जोशी, संदीप निळे, रमाकांत डगळे, महेश शेलार, जॉन मेंढीस, सुधीर दंदाडे, वैभव शेलार तसेच इतर सेवेकरी उपस्थित होते. हॉटेल व्यावसायिक राजेश शेट्टी व चैत्रा शेट्टी यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन पुजा झाली.

या वेळी समाजसेवक भास्कर शेट्टी, मोतीराम पालकर, आर.आर.पाटील, स्मिता पाटील यांची विशेष उपस्थित होती.

क्लिक...क्लिक...!



श्रीवर्धन : येथील समुद्रकिनारी मावळणाऱ्या सूर्याचे संतोष चौकर यांनी टिपलेले छायाचित्र.

## सानपाड्यामध्ये नववर्ष शोभायात्रेस नागरिकांचा प्रतिसाद

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा येथील अखिल सानपाडा सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि अखिल सानपाडा रहिवाशी महासंघ यांच्या वतीने १४व्या वर्षी हिंदू मराठी नववर्ष व गुढीपाडव्यानिमित्त गणेश मंदिरापासून निघालेली भव्य शोभायात्रा अत्यंत उत्साहात, जल्लोषात आणि आनंदामध्ये यशस्वी केली.

ही शोभायात्रा गणेश मंदिर, केमिस्ट भवन, मराठा भवन, सेक्टर ८, सेक्टर ३, बधाई स्वीट्स, सेक्टर १०, न्यू मिलेनियम हॉस्पिटल, मिलेनियम टॉवर, गणेश मंदिर, अशा पद्धतीने काढण्यात आली होती. यामध्ये रथ, ढोल पथक, लेझीम नृत्य,



रांगोळी, वारकरी भजन मंडळ. पारंपारिक वेशभूषा इत्यादी आकर्षण मोठ्या प्रमाणात होते. सदर शोभायात्रेत नवी मुंबईचे माजी आ. संदीप नाईक, माजी नगरसेवक सोमनाथ वासकर, नगरसेविका कोमल वासकर, माजी नगरसेवक शंकर माटे, समाजसेवक मिलिंद सूर्याराव, पांडुरंग आमले, भाऊ भापकर, आबा जगताप, विकास वाघुले, महेश बनकर, अखिल सानपाडा रहिवासी महासंघाचे अध्यक्ष कैलास ताजने, सह सचिव अजय पवार, सुनील चव्हाण आणि खजिनदार श्रीकांत चव्हाण व सर्व पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी, सानपाड्यातील ज्येष्ठ नागरिक, महिला, सानपाडा सांस्कृतिक प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, मराठा विकास प्रतिष्ठानचे पदाधिकारी, गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी, सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व रहिवासी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.


सोबत अजय पवार आणि विजय वीरकर यांच्या संयोगाने गामी ग्रुप नवी मुंबई यांच्या वतीने यात्रा सुरू होताना आणि बधाई स्वीट येथे नाष्टा, मिठाई, ज्यूस आणि पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

# श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर मोकाट श्वानांचा वाढता त्रास

## स्थानिकांची प्रशासनाकडे उपाययोजनेसाठी मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन समुद्रकिनारा, जो पर्यटकांची आवडती ठिकाण आहे, सध्या मोकाट श्वानांच्या वाढत्या संख्येमुळे असुरक्षित ठरू लागला आहे. मोकाट श्वानांच्या टोळ्यांमुळे स्थानिकांना आणि पर्यटकांना दररोज त्रास सहन करावा लागतो. काही महिन्यांपूर्वी बंधाऱ्यावर एका महिला पर्यटकावर श्वानाने हल्ला केला होता, ज्यामध्ये श्वानाने अंगावर उडी घालून तिचा चावा घेतला. तर, नुकत्याच झालेल्या एका घटनेत, एका लहान मुलीला श्वानांच्या टोळक्यांनी धडक दिली आणि ती घाबरलेली स्थितीत पळाली. त्यामुळे स्थानिकांकडून प्रशासनाकडे त्वरित हस्तक्षेप करण्याची मागणी जोर धरू



लागली आहे.

श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावर येणारे पर्यटक जेवणाच्या वेळी श्वानांना अन्न देण्याची चुक करतात, ज्यामुळे श्वानांच्या संख्येत वाढ होत आहे. पर्यटकांसाठी जास्त सोयीच्या असलेल्या किनाऱ्यावरील टपऱ्या, ज्यात नाश्ता, चहा आणि वेगवेगळ्या प्रकारचे जेवण दिले जाते, तेथे श्वानांसाठी उरलेले अन्न आणि खरकट्या डिशेस त्यांना आकर्षित करतात. अस्वच्छपणामुळे ही समस्या आणखी वाढत आहे. स्थानिक आणि पर्यटकांना असुरक्षित वाटू लागले आहे, विशेषतः ते जेव्हा व्यायाम किंवा फेरफटका मारण्यासाठी समुद्रकिनाऱ्यावर जातात, तेव्हा श्वानांच्या टोळक्यांची उपस्थिती त्रासदायक ठरते.

अशा स्थितीत, श्रीवर्धन नगरपरिषदेने त्वरित उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. मोकाट श्वानांचे संख्याबध्द नियंत्रण, अनधिकृत टपरी चालकांवर कारवाई करणे आणि श्वानांच्या अन्नाची योग्य विल्हेवाट लावणे यासारख्या ठोस उपायांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

स्थानिकांची तसेच पर्यटकांची सुरक्षा आणि आरोग्याची काळजी घेत प्रशासनाने त्वरित कदम उचलावेत, असे नागरिकांच्या वतीने सांगण्यात येत आहे. प्रशासनाकडून या समस्येला तातडीने वाव देऊन उपाययोजणे अत्यंत गरजेचे आहे.

# मुंबई-पुणे महामार्गाची दुरूस्ती



## रखडलेले रूंदीकरण करण्याची गरज

**खोपोली : प्रतिनिधी**

जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर खोपोली शिळफाटा ते खोपोली गाव दरम्यान अपघाताचे वाढलेले प्रमाणावर आयआरबीकडून उपाययोजना सुरू झाली आहे.

शिळफाटा येथील धोकादायक दुभाजकाचा भाग हटवण्यात आला असून काही ठिकाणी महामार्गावर वर आलेली खडी डांबर काढून रस्ता समतल करण्यात आला आहे. जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर खालापूर ते खोपोली मार्गाचे चौपदरीकरण काम शिळफाटा ते विश्रामगृह भागात रखडले आहे. या पट्ट्यात वाहतुकीचा कायम ताण असतो. शाळा, बसस्थानक , बँक, मॉल यामुळे परिसर कायम गजबजलेला असतो. याठिकाणी पादचारी साठी फूटपाथ देखील नसल्याने अपघाताची कायम टांगती तलवार याठिकाणी असते.

चार दिवसांत दोन अपघात घडले असून एकाला जीव गमवावा लागला तर दुसऱ्या अपघातात भरधाव टेम्पोचालकाने दुभाजक धडक दिल्याने चालक जखमी होऊन वाहतूकदेखील बाधित झाली होती. आयआरबी कडून तुटलेले दुभाजक जेसीबीच्या साहाय्याने हटवण्यात आले आहेत. रम्बलिंग स्ट्रिप्स,प्लास्टिक बॅरिकेड्स, रेडियम प्लेट बसविण्यात आले आहे, परंतु हि तात्पुरती उपाययोजना असून शिळफाटा ते विश्राम गृह रखडलेले रस्ता रुंदीकरण लवकर मार्गी लागावे, अशी मागणी होत आहे.

# रसायनीत दुचाकीस्वार अपघातात ठार

**खोपोली : प्रतिनिधी**

कोन-रसायनी मार्गावर जाताडे येथे वळणावर दुचाकी झाडाला धडकून झालेल्या अपघातात केतन जाधव (वय २८, रा. गुळसुंदे, रसायनी) याचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि.३१) मध्यरात्री घडली.

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत सावळा ते रसायनीदरम्यान रस्त्यावर जाताडे वळणावर केतनची दुचाकी रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडावर आदळली. अपघातात केतन मृत्युमुखी पडला. याबाबतची नोंद रसायनी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# ओम श्री करकरणी मातेचा उत्सव

**पाली : प्रतिनिधी**

निसर्गाच्या सानिध्यात, डोंगराच्या कुशीत वसलेल्या झोतीरपाडा, रिलायन्स टाऊन शिप गेटसमोरील श्री करकरणी मंदिरात भव्य उत्सव सोहळा धार्मिक वातावरणात व धुमधडाक्यात साजरा झाला.



सालाबादप्रमाणे यंदाही २९ ते ३० मार्च २०२५ या दिनी ग्रामस्थ मंडळ झोतीरपाडा व पंचक्रोशी यांच्या सलोख्याने उत्सव पार पडला. दरवर्षीप्रमाणे यंदा ही मोठी यात्रा भरली होती. या वेळी भाविक भक्त गणांची मांदियाळी दिसून आली. ओम श्री करकरणी आई उत्सव सोहळ्यानिमित्ताने विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवानिमित्त मंदिर परिसरात भव्य यात्रा भरवली जाते.

ओम श्री करकरणी मातेच्या उत्सवानिमित्त संगीत भजनाचे कार्यक्रम व पारंपरिक नाच आदी कार्यक्रम झाले. या वेळी प्रसाद भोईर, भाजप नेते वैकुंठ पाटील, आदींनी या उत्सवाला भेट दिली. या वेळी मंदिराचे पुजारी दत्तात्रेय तानाजी कुथे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे शाल, श्रीफळ देऊन स्वागत केले.

# कर्जत-खोपोली लोकल गाड्या वाढविण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत-खोपोलीदरम्यान संध्याकाळच्या वेळेत लोकल गाड्या उपलब्ध नसल्यामुळे प्रवाशांना होणाऱ्या अडचणींबाबत सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांनी आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेतली. संध्याकाळच्या सुमारास अडीच तास खोपोलीकडे जाण्यासाठी लोकल नाही. या दरम्यान लोकल वाढविण्याची मागणी केली.

खोपोलीला जाण्यासाठी संध्याकाळी ५:११ नंतर थेट ७:२८ वाजता लोकल उपलब्ध असल्याने तब्बल अडीच तास प्रतीक्षा करावी लागत आहे. पंकज ओसवाल यांनी याबाबतची माहिती आमदार थोरवे यांना दिली. या विषयाची गंभीर दखल घेत आमदार महेंद्र थोरवे यांनी तत्काळ रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले असून, लवकरच मध्यरेल्वेच्या महाव्यवस्थापकांच्या कार्यालयात निवेदन देण्यात येणार आहे.

स्थानकांवरील गर्दी, चाकरमानी आणि प्रवाशांच्या सोयीसाठी संध्याकाळच्या वेळेत अधिक लोकल सुरू करण्यासाठी थोरवे आग्रही



आहेत. या वेळी रेल्वे प्रशासनाला सर्व मागण्यांवर लक्ष केंद्रित करून योग्य तो पाठपुरावा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कर्जत-खोपोली प्रवाशांना अधिक सुविधा मिळाव्यात. यासाठी थोरवे सातत्याने प्रयत्नशील आहेत.

संध्याकाळच्या वेळेत अधिक लोकल सेवा उपलब्ध होण्यासाठी लवकरच सकारात्मक निर्णय होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त करण्यात आला आहे.

# घरगुती वादातून एकाला मारहाण

**चौक, मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील पत्रकार अमोल सांगळे यांना मारहाण करण्यात आली असून, या मारहाणीत अमोल सांगळे जंभीर जखमी झाले असून त्यांच्या डोळ्याला जबर मार लागला आहे.

पत्रकार अमोल सांगळे यांची दोन लहान मुले अंगणात बॅडमिंटन खेळत असताना शटलकॉक शेजारच्या अंगणात पडला असता तो आणण्यासाठी बहिणीने सांगितल्यावर अमोल सांगळे यांचा मुलगा कॉक घेण्यास गेला असता, प्राची हेमंत पाटील ही लावंण्या या मुलीच्या अंगावर धाऊन व मुलीच्या आईला शिवीगाळ करून कानाखाली मारले. याचे चित्रण करत असताना प्राची हेमंत पाटील हिने मोबाईल हिसकावून घेतला आणि पाठीत मारहाण करत असता शेजारी राहत असणाऱ्या नातेवाईक यांनी लहान मुलांन वरून का भांडता, असे नातेवाईक बोलले असता प्राची मोबाईल घेऊन गेली. यानंतर वाद शांत झाला. त्या नंतर अमोल सांगळे आपली पत्नी व मुलगा यांना घेऊन बाहेर जात असताना प्राची हेमंत पाटील, प्रतिक सांगळे प्रभाकर सांगळे हे पत्रकार अमोल सांगळे हे मोटार सायकल घेउन उभे असलेल्या ठिकाणी येत प्राची हेमंत पाटील, प्रतिक प्रभाकर सांगळे व प्रभाकर बाळाराम सांगळे यांनी मिळून पत्रकार अमोल सांगळे यांच्यावर प्राण घातक हल्ला चढविला.

या वेळी प्रभाकर सांगळे यांनी पत्रकार अमोल सांगळे यांच्या डोक्यावर हेल्मेट ने प्रहार चढविला तर प्रतिक सांगळे याने स्विप्ट गाडीची चावी हाताच्या बोटात घट्ट मुठ्ठीत कसून पकडत उजव्या डोल्याच्या खाली आणि डोक्यावर वार चढविले, ज्यामुळे पत्रकार अमोल सांगळे हे गंभीर जखमी झाले. मोटरसायकलवर बसलेल्या मुलाला अमोल सांगळे यांनी वाचविण्याचा प्रयत्न केला. अमोल सांगळे यांनी जखमी अवस्थेत चौक पोलीस ठाण्यात गेले असता पोलिसांनी त्यांना ग्रामीण रुग्णालय चौक येथे उपचारासाठी पाठवले, त्या नंतर ते रसायनी येथे रेगे हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले.


या गंभीर घटनेनंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पत्रकार अमोल सांगळे हे शांत स्वभावाचे आहेत, त्यांच्यावर झालेला हल्ला आम्ही सहन करणार नाही, आरोपी यांना अटक न केल्यास वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना भेटून आरोपी यांच्या अटकेची मागणी करू, असे मराठी पत्रकार परिषद संघाचे रायगड अध्यक्ष राकेश खराडे यांनी सांगितले.

# कर्जत तालुक्यामध्ये रमजान ईद साजरी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरामध्ये रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कर्जत शहरातील सुन्नी जामा मस्जिदमध्ये नवीन कपडे परिधान करून सुगंधी अत्तर लावून मुस्लिम बांधव ईद साजरी करण्यासाठी सकाळी मशिदी मध्ये पोहचले होते. मशिदींमध्ये सामूहिक नमाज अदा करण्यात आले.



पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड मशिदी जवळ स्वतः हजर होते त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड व कर्मचाऱ्यांनी मुस्लिम बांधवांना गुलाब पुष्प देवून ईद च्या शुभेच्छा दिल्या तर मशिदीचे अध्यक्ष सैदु शेख यांनी पोलीस निरीक्षक गरड यांना शाल व गुलाब पुष्प घेऊन त्यांचे स्वागत केले.

### घरोघरी सजावट

रमजान ईदनिमित्ताने मुस्लिम नागरिकांच्या घरी उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण दिसून येत आहे. घरोघरी रमजान ईद निमित्ताने आकर्षक विद्युतरोषणाई करण्यात आली आहे. तसेच, घरही उत्साहाने सजविण्यात आले आहे. दरम्यान, नमाज अदा झाल्यावर मुस्लिम बांधवांनी मशिदी बाहेर शुभेच्छा दिल्या.

# आदिवासी बांधवांना धान्याचे किट वाटप

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानच्या डोंगरदऱ्यांमध्ये राहणाऱ्या आदीवासी बांधवांना मुंबई येथील पीस फाउंडेशन संस्थेमार्फत गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर धान्याचे किट वाटप करण्यात आले असून आदिवासी बांधवांचा गुढीपाडवा गोड झाला आहे.

पीस फाउंडेशन संस्थेच्या वतीने माथेरान शहरात पहिल्यांदाच असा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. माथेरानमध्ये असा उपक्रम राबविण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्या वर्षा शिंदे आणि त्यांच्या महिला सहकाऱ्यांची मोलाची साथ, मोलाचे सहकार्य या संस्थेला मिळाले.



माथेरान गिरीस्थान नगर परिषद शाळेच्या आवारात रविवारी गुढीपाडव्याच्या शुभदिनी हा कार्यक्रम झाला. या वेळी उपस्थित आदिवासी भगिनींच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. या वेळी पीस फाउंडेशन संस्था मुंबईचे डॉ.चारुल शहा, योगेश शहा,अरुणा सावला, चंद्रिका गाडा, राजेश गाडा आणि त्यांचे कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

**नागोठणे : श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त खडकआळीतील श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक विकास केंद्रात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी काढण्यात आलेल्या पालखी सोहळ्यामुळे नागोठण्यात श्री स्वामी समर्थ नामाचा गजर दुमदुमला. श्री स्वामी समर्थांच्या पालखीचे भाविकांनी दर्शन घेतले.**



# खालापूर परिसरात ईद उत्साहात



**खोपोली :** तालुक्यातील खोपोली, चौक, वावोशी, रसायनीत रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली. १५ दिवसांपूर्वी खालापूर तालुक्यात गोवंश कत्तलीवरून वाद निर्माण झाला होता.

या पार्श्वभूमीवर तालुक्यात कुठेही सणासुदीला गालबोट लागू नये यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम पोलीस निरीक्षक सचिन पवार सातत्याने शांतता बैठक, मोहल्ला कमिटी बैठकीच्या माध्यमातून दोन्ही समाजातील सलोखा प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील होते.

# सेवानिवृत्त मुख्याध्यापिका कर्णिक यांना पुरस्कार

**मुरुड : प्रतिनिधी**

शहरातील राहणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याची झालर असणाऱ्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका नैनिता नयन कर्णिक यांना या वर्षीचा सन २०२५चा राज्यस्तरीय भारतज्योती प्रतिभारत्न नारीगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

या पुरस्कारांमध्ये त्यांना शाल, मानपत्र व टॉफी देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले आहे. मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी संस्थेच्या वतीने सांस्कृतिक सभागृह मागल्य दादर येथे राज्यस्तरीय भारतज्योती नारीगोरव पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी नंदकुमार सावंत सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक, लेखक अभिनेता, डॉ.नंदकुमार सावंत, गुन्हे अन्वेषण विभाग प्रमुख सायली जाधव, माजी तहसीलदार नयन कर्णिक, रश्मी देशपांडे, आशुतोष कर्णिक आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात संस्थापक कृष्णाजी जगदाळे यांनी ही संस्था २५ वर्ष महिला दिनाच्या निमित्ताने नारीशक्ती गौरव पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगितले.




# दहिवलीतील शिलाहारकालीन श्री महालक्ष्मी मूर्तीचे संवर्धन



**कर्जत : प्रतिनिधी**

गेल्या ५८ वर्षांपासून विस्मृतीत गेलेल्या दहिवली गावच्या श्री महालक्ष्मी ग्रामदेवतेची मूर्ती अखेर उजेडात आली असून, तिला संवर्धनीत करण्यासाठी हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत.

आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते नदीघाटाच्या सुशोभीकरणासाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. याच ठिकाणी श्री महालक्ष्मी मूर्तीचे संवर्धन केले जाणार आहे. त्यामुळे संपूर्ण दहिवली गावासाठी हा ऐतिहासिक क्षण ठरणार आहे तसेच ही मूर्ती ज्या ठिकाणी सापडली तिथेच गावाच्या वेशीच्या देवता साती आसरांचे देवस्थान आहे ज्याचा कुलाचार भोई समाज करत असतो.

पुरातत्व संशोधक सागर सुर्वे यांनी दहिवली गावातील श्री महालक्ष्मी मूर्तीचा शोध घेत असताना या मूर्तीच्या ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्वावर प्रकाश टाकला. त्यांच्या संशोधनानुसार, ही मूर्ती शिलाहारकालीन असून ती बाराव्या शतकातील दोहनपल्ली (सध्याचे दहिवली) गावाचा एकमेव ठोस पुरावा आहे.

सुर्वे यांच्या अभ्यासानुसार शिलाहार राजवटीत दहिवली गाव धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचे केंद्र होते. श्री महालक्ष्मी ही त्या काळातील स्थानक मूर्तींपैकी एक असून, तिची मूळ प्रतिष्ठापना दहिवली गावाच्या केंद्रस्थानी एका प्रमुख मंदिरात करण्यात आली होती.

# मुंबईचा केकेआरवर दणदणीत विजय

## पदार्पणवीर अश्वनी कुमारच्या चार विकेट्स



**मुंबई : प्रतिनिधी**

अश्वनी कुमारच्या चार विकेट्स, इतर गोलंदाजांची योग्य साथ आणि रायन रिकल्टनच्या अर्धशतकाच्या जोरावर मुंबई इंडियन्सने आयपीएलच्या यंदाच्या हंगामातील पहिला दणदणीत विजय मिळवला. मुंबईने घरच्या मैदानावर कोलकाता नाईट रायडर्सचा आठ गडी राखून पराभव केला. मुंबईने केकेआरला १६.२ षटकांत ११६ धावांवर सर्वबाद केले आणि नंतर अवघ्या १२.५ षटकात विजय साकारला.

केकेआरने वानखेडेच्या मैदानावर दिलेल्या ११७ धावांच्या छोट्या लक्ष्याच्या प्रत्युत्तरात मुंबईने सावध सुरुवात केली. रोहित शर्माने एक षटकार खेचला खरा, पण तो पुन्हा एकदा लवकर (१३ धावा) बाद झाला. विल जॅक्सही एक षटकार लगावत १६ धावा करत बाद झाला. रायन रिकल्टनने ४१ चेंडूत चार चौकार आणि पाच षटकारांसह ६२ धावांची खेळी केली.

वानखेडेच्या मैदानावर सूर्यकुमार यादव पुन्हा एकदा फॉर्मात परतला आणि त्याने ३००च्या स्ट्राईक रेटने नऊ चेंडूत तीन चौकार आणि दोन षटकारांसह २७ धावांची खेळी करून संघाच्या विजयात योगदान दिले. केकेआरकडून आंद्रे रसेलला दोन विकेट घेण्यात यश मिळाले.

तत्पूर्वी मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि हा निर्णय अगदी योग्य ठरला. ट्रेंट बोल्ट व दीपक चहर या गोलंदाजी जोडीने केकेआरची झोप उडवली. पॉवरप्लेमध्येच निम्मा संघ तंबूत परतला होता. मुंबईचा पदार्पणवीर अश्वनी कुमार या सामन्याचा हिरो ठरला, ज्याने तीन षटकांत २४ धावा देत चार विकेट्स घेतल्या. चहरने दोन, तर बोल्ट, हार्दिक पांड्या, विघ्नेश पुथूर आणि सँटनर यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. या विजयासह मुंबईचा संघ गुणतालिकेत अखेरच्या स्थानावरून थेट सहाव्या स्थानी पोहचला आहे.

### घरच्या मैदानावर ऐतिहासिक कामगिरी

आयपीएलमध्ये केकेआरविरुद्ध विजय नोंदवून मुंबई इंडियन्स संघाने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. मुंबई संघ आयपीएलमध्ये एकाच मैदानावर विरोधी संघाविरुद्ध सर्वाधिक विजय नोंदवणारा संघ बनला आहे. मुंबईने आयपीएलमध्ये घरच्या वानखेडे स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्स संघाविरुद्ध एकूण १० सामने जिंकले आहेत. यासह मुंबईने केकेआरचा विक्रम मागे टाकला आहे. कोलकात्याच्या ईडन गार्डन्स या घरच्या मैदानावर केकेआर संघाने पंजाब किंग्जविरुद्ध नऊ सामने जिंकले आहेत.



# क्रिकेट स्पर्धेत शिवप्रेमी डोलवहाळ संघ विजेता

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहे तालुक्यातील कोलाड ग्रामीण क्रिकेट असोसिएशन संलग्न श्री शिव शंभू युवा मंडळ गोवे आयोजित क्रिकेट स्पर्धेत शिवप्रेमी डोलवहाळ संघाने विजेतेपद पटकाविले. पोलीस अधिकारी नितीन मोहिते व त्यांचे सहकारी नरेश पाटील यांच्या हस्ते विजेत्या संघाला पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

गोवे येथील तटकरे कॉलेजच्या मैदानावर ३० व ३१ मार्च अशी दोन दिवस रंगलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन सरपंच महेंद्र पोटफोडे यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेला युवा नेते संदीप तटकरे, माजी सरपंच नरेंद्र पवार, प्रवीण पवार, नरेंद्र जाधव, उपसरपंच निशा जवके, वन अधिकारी शाम गुजर, पोलीस रवींद्र गुजर, विश्वनाथ गुजर, सदस्य सुप्रिया जाधव, नितीन जाधव, लहू पिपलकर, अनंता पवार, रामचंद्र पवार, शाम पवार, संदीप जाधव, बाबू पवार, कमलाकर पवार, श्रीधर गुजर, भरत जाधव, गावकी अध्यक्ष बळीराम जाधव, रवी जाधव, भाई सानप, प्रजोत पवार, कोलाड ग्रामीण क्रिकेट असोसिएशन कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी भेट देत आयोजकांचे कौतुक केले आणि खेळाडूंना प्रोत्साहन दिले.

स्पर्धेत द्वितीय क्रमांक यशवंत नगर कोलाड, तृतीय श्रीक्षेत्र पाल पूई आणि चषक चतुर्थ क्रमांक श्री राम महादेव वाडी या संघांनी प्राप्त केला. विजेत्या चारही संघांना रोख रक्कम व चषक देण्यात आले.

मालिकावीर रोहन मोरे (श्री राम महादेववाडी), उत्कृष्ट फलंदाज आकाश (यशवंत नगर कोलाड) उत्कृष्ट गोलंदाज नितेश धामनसे (शिवप्रेमी डोळवहाळ), उत्कृष्ट क्षेत्ररक्षक प्रसाद चिनके (पूई), पब्लिक हीरो शंकर जाधव व प्लेअर ऑफ डे आकाश (यशवंत नगर) यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

समालोचन व सूत्रसंचालन निलेश जाधव, मुंडे, गणेश दिघे यांनी केले. स्पर्धा यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष किरण पवार, उपाध्यक्ष दिशांन दहीबेकर, सेक्रेटरी सुभाष पवार, नितेश दहीबेकर, खजिनदार निलेश कोंजे, सतीश दिघे, सल्लागार विजय पवार, दीपक गुजर, विशाल पवार, अनिल पवार, गणेश दिघे, मनोज पवार, कुणाल पवार, रितेश पवार, जितू बामुगडे, विनायक जवके, नितेश दहीबेकर व अन्य सभासदांनी मेहनत घेतली.

# विंडसर्फिंग आणि काइटबोर्डिंग चॅम्पियनशिपमध्ये राज पाटीलला सुवर्णपदक



**उरण : प्रतिनिधी**

गोव्यात आयोजित ऑल इंडिया विंडसर्फिंग आणि काइटबोर्डिंग चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेत याच्टिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्राच्या राज संतोष पाटील याने सुवर्णपदक जिंकले, तर महाराष्ट्रातील इतर खेळाडूंनीही अप्रतिम कामगिरी करत पदके जिंकली.

गोव्यीील मोंटेगो बे व्हिलेज रिसॉर्ट–मोरजीम येथे याच्टिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि. ३१) ही स्पर्धा घेण्यात आली. देशभरातील उत्कृष्ट विंडसर्फर आणि काइटबोर्डर या स्पर्धेत सहभागी झाले होते.

स्पर्धेत याच्टिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या खेळाडूंनी अनेक पदके जिंकली. राज पाटील याने सुवर्णपदक पटकावित आपले वर्चस्व सिद्ध केले. महिला गटात नाव्या काकू हिने सुवर्णपदकावर नाव कोरले. प्रियंशी मयूर पाटील हिने कांस्यपदक मिळवले. संतोष साई पाटील अवघ्या काही गुणांच्या फरकाने चौथ्या स्थानावर राहिला, तर युवा खेळाडू मोहित संदीप म्हात्रे याने पाचवे स्थान मिळवले.


भारतातील नामवंत खेळाडूंसाठी ही स्पर्धा राष्ट्रीय क्रमवारी निश्चित करण्यासाठी तसेच आंतरराष्ट्रीय निवडीसाठी महत्त्वाची ठरते. महाराष्ट्राच्या खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशामुळे राज्याच्या जलक्रीडा क्षेत्रातील वर्चस्व अधोरेखित झाले आहे.

# संजूच्या नेतृत्वाबाबत बीसीसीआय घेणार निर्णय

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

दोन पराभवांनंतर तिसऱ्या सामन्यात विजय नोंदवून खाते उघडणारा राजस्थान संघाचा नियमित कर्णधार संजू सॅमसन याला विजयानंतर बीसीसीआयने अंतिम फिटनेस चाचणीसाठी तातडीने 'सेंटर ऑफ एक्सलन्स' येथे पाचारण केले. त्याच्या क्षेत्ररक्षण आणि यष्टिरक्षण कौशल्यावर अंतिम निर्णय होईल. त्यानंतरच तो आयपीएलमध्ये संघाचे नेतृत्व करू शकेल.

पहिल्या तीन सामन्यांत संजू फलंदाज म्हणून खेळला. ध्रुव जुरेलने यष्टिरक्षकाची भूमिका बजावली. संजू फिटनेस चाचणीत पास झाल्यास तो यष्टिरक्षण करू शकतो आणि कर्णधाराच्या भूमिकेत पुन्हा दिसू शकतो. संजूच्या दुखापतीमुळे राजस्थानने




पहिल्या तीन सामन्यांसाठी रियान परागला कर्णधार केले होते. संजूच्या बोटाची दुखापत पूर्णपणे बरी झाली आहे आणि यष्टिरक्षणासाठीही तंदुरुस्त असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाकडून त्याला होकार द्यावा लागेल.

संजूने आतापर्यंत झालेल्या तीन सामन्यांत ६६ (वि. हैदराबाद), १३ (वि. कोलकाता) आणि २० (वि. चेन्नई) धावा केल्या आहेत. तो या सामन्यात इम्पॅक्ट प्लेअर म्हणून खेळला.

# जास्मिन वालिया मुंबई संघाच्या बसमध्ये शिरल्याने चर्चेला उधाण; व्हिडीओ व्हायरल

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सच्या संघाला अखेर घरच्या वानखेडे मैदानावर सूर गवसला. कोलकाताविरुद्धच्या सामन्यात त्यांनी अतिशय सहज विजय मिळवला. या विजयासोबत आणखी एका व्यक्तीची सध्या चर्चा रंगली आहे, ती म्हणजे कर्णधार हार्दिक पांड्याची तथाकथित गर्लफ्रेंड जास्मिन वालिया. ब्रिटीश गायिका आणि टीव्ही सेलिब्रिटी असलेल्या जास्मिनबाबत सध्या एक वेगळाच व्हिडीओ व्हायरल झाला आहे.



मुंबई इंडियन्सने यंदाच्या हंगामात तीन सामने खेळले. त्यातील घरच्या वानखेडे मैदानावर खेळवण्यात आलेला हा पहिलाच सामना होता. मुंबईने याआधी जिथे सामने खेळले तिथे हार्दिकची कथित गर्लफ्रेंड जास्मिन वालिया स्टेडियममध्ये हजर होती. सोमवारी मुंबईच्या वानखेडे स्टेडियममध्येही ती आली होती. त्यानंतर तिचा एक व्हिडीओ व्हायरल झालाय.

असे सांगण्यात येत आहे की, जास्मिन वालिया मुंबई इंडियन्सच्या टीम बसमध्येच चढली आणि ती त्यांच्या टीम बसमधूनच प्रवास करताना दिसत आहे. टीम बसमधून केवळ खेळाडू, सपोर्ट स्टाफ आणि खेळाडूंचे पार्टनर्स यांनाच प्रवासाची परवानगी असते. त्यामुळे हार्दिक आणि जास्मिन यांच्यात नक्कीच काहीतरी शिजतंय या चर्चेला आता खतपाणी मिळाले आहे.

# आयपीएलमध्ये अश्वनी कुमारने घडवला इतिहास

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध मुंबई इंडियन्स संघाने दणदणीत विजय मिळवला. या सामन्यात मुंबई इंडियन्सकडून अश्वनी कुमार या नव्या गोलंदाजाने पदार्पण केले आणि पदार्पणातच त्याने वादळी कामगिरी करीत चार विकेट्स आपल्या नावे केल्या. विशेष म्हणजे अश्वनीने आयपीएलमधील त्याच्या पहिल्याच चेंडूवर विकेट घेत आपल्या गोलंदाजीचा प्रत्यय दिला. यासह त्याने अनोखा विक्रम आपल्या नावे केला आहे.



अश्वनी कुमारने दीपक चहरच्या गोलंदाजीवर क्विंटन डी–कॉकचा झेल घेत आपला परिचय करून दिला. यानंतर त्याला पॉवरप्लेमध्ये पहिले षटक टाकण्याची मोठी जबाबदारी दिली गेली. अश्वनीने या पहिल्याच चेंडूवर अजिंक्य रहाणेला झेलबाद करीत दणक्यात सुरुवात केली. यानंतर त्याने स्पेलमधील पुढच्या षटकात दोन मोठ्या विकेट्स घेतल्या. त्याने आधी रिंकू सिंगला झेलबाद केले. त्यानंतर मनिष पांडेला त्याच षटकात क्लीन बोल्ड केले. मग त्याने स्पेलमधील पुढच्या षटकात आंद्रे रसेलला क्लीन बोल्ड करत केकेआरच्या आशांवर पाणी फेरले.

अश्वनीने त्याच्या स्पेलमधील तीन षटकांत ८च्या इकॉनॉमीने २४ धावा देत चार विकेट्स घेतल्या आणि इतिहास घडवला. अश्वनी हा आयपीएलमध्ये पदार्पणात तीनपेक्षा जास्त विकेट घेणारा पहिला भारतीय आणि जागतिक चौथा गोलंदाज ठरला. पंजाबच्या २३ वर्षीय गोलंदाजाने वानखेडे स्टेडियमवर आपल्या भेदक गोलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

आयपीएल पदार्पणात अल्झारी जोसेफ (मुंबई इंडियन्स)विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद १२ धावांत सहा विकेट्स, अँण्ड्र्यू टाय (गुजरात लायन्स)विरुद्ध आरपीएस १७ धावांत पाच विकेट्स आणि शोएब अख्तर (केकेआर) विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स ११ धावांत चार विकेट्स अशी कामगिरी तीन गोलंदाजांनी केली आहे. यानंतर आता अश्वनी चौथ्या स्थानी आला आहे.

### संधीचे सोने केले!

अश्वनी कुमारचा हा पहिलाच आयपीएल सामना होता. मुंबई इंडियन्सने आयपीएल लिलावात त्याला ३० लाख रुपयांच्या किमतीसह संघात घेतले होते. २०२३च्या शेर–ए–पंजाब ट्रॉफीमध्ये तो सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज होता. अश्वनी पंजाबकडून देशांतर्गत क्रिकेट खेळतो आणि तो मोहालीच्या झांजेरी गावचा आहे. गेल्या मोसमात त्याचा पंजाब किंग्ज संघात समावेश करण्यात आला होता, मात्र त्याला पदार्पणाची संधी मिळाली नाही. मुंबईकडून मिळालेल्या संधीचे त्याने सोने केले.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com